मंगळवार, १० जानेवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक १७३
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

खालापुरात दिराकडून वहिनींवर बलात्कार/२
रेवदंडा किनारा स्वच्छता अभियानास प्रतिसाद/५
माथेरानमध्ये रंगला अश्वशर्यतींचा थरार/८

## राज्यातील सत्तासंघर्षावर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी



**नवी दिल्ली :** राज्यातील सत्तासंघर्ष प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे मंगळवारी (दि. १०) सुनावणी होणार आहे. या प्रकरणी सात सदस्यीय घटनापीठाकडे सुनावणी सोपवायची की नाही याबाबत या वेळी निर्णय होण्याची शक्यता आहे. शिवसेनेतून उठाव केलेले आमदार आणि राज्य सरकारच्या घटनात्मक वैधतेसह अन्य मुद्द्यांवर आव्हान देणाऱ्या याचिका शिवसेना नेते सुभाष देसाई, सुनील प्रभू यांनी सादर केल्या आहेत, तर आमदार अपात्रतेच्या नोटिसा, शिवसेना विधिमंडळ नेतेपदावरून दूर करण्याचा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा निर्णय यासह काही बाबींना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार भरत गोगावले आदींनी आव्हान दिले आहे. या विविध मुद्द्यांवर पाच सदस्यीय घटनापीठ मंगळवारी निर्णय देणे अपेक्षित आहे.

### कोकण शिक्षक मतदारसंघ निवडणूक

# भाजप युतीतर्फे ज्ञानेश्वर म्हात्रे रिंगणात





**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या कोकण शिक्षक मतदारसंघात भारतीय जनता पक्ष आणि बाळासाहेबांच्या शिवसेना युतीकडून ज्ञानेश्वर म्हात्रे यांना उमेदवारी देण्यात आली असून ते या निवडणुकीत विजयी होतील, असा विश्वास भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी (दि. ९) व्यक्त केला. ते मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

या पत्रकार परिषदेस बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे नेते व उद्योगमंत्री उदय सामंत आणि भाजप नेते व सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण हेही उपस्थित होते. युतीतर्फे या मतदारसंघासाठी ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या उमेदवारीची घोषणा दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी या वेळी केली. या निवडणुकीत म्हात्रे यांची वाटचाल विजयाच्या दिशेने सुरू झाली आहे, असे मंत्री सामंत व चव्हाण म्हणाले.

दरम्यान, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी यांनी कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे भाजप-शिवसेना युतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांची सदिच्छा भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्या. माजी नगरसेवक हरेश केणी व अन्य मान्यवर समवेत होते.

### पनवेलमध्ये काँग्रेसला झटका

# माजी नगरसेवक सिद्धार्थ बांठिया भाजपमध्ये




### पटोलेंचा बार फुसका!

तीन दिवसांपूर्वी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पनवेलमध्ये मेळावा घेतला होता. त्यामुळे काँग्रेसला ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा होती, मात्र या ठिकाणी काँग्रेसला ऊर्जा मिळण्याऐवजी सिद्धार्थ बांठिया यांच्या रूपाने हादरा बसला आहे.

**पनवेल : वार्ताहर**


पनवेल शहरात काँग्रेसला मोठा झटका बसला आहे. युवक काँग्रेसचे माजी प्रदेश जनरल सेक्रेटरी आणि माजी नगरसेवक सिद्धार्थ बांठिया यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पक्षाची शाल स्वीकारत बांठिया यांनी सोमवारी (दि. ९) पक्षप्रवेश केला.

मुंबईतील दादर येथील भाजपच्या प्रदेश कार्यालयात सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, रायगड जिल्हाध्यक्ष तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, ठाणे जिल्हा अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिद्धार्थ बंठिया यांनी भाजपचे नेतृत्व स्वीकारले. (पान २ वर..)

## ज्येष्ठ माध्यमकर्मी विश्वास मेहेंदळे यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ माध्यमकर्मी डॉ. विश्वास मेहेंदळे यांचे सोमवारी (दि. ९) निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. डॉ. विश्वास मेहेंदळे आजारी असल्याने मुलुंड येथे मुलीकडे राहत होते. तेथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



डॉ. विश्वास मेहेंदळे हे वृत्तनिवेदक, लेखक, अभिनेतेही होते. अनेक कार्यक्रमांच्या सूत्रसंचालनासोबतच १८हून अधिक पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. याव्यतिरिक्त मराठी नाट्यसृष्टीचे भाष्यकार म्हणूनही ते ओळखले जायचे. त्यांनी काही काळ महाराष्ट्र शासनासाठीही काम केले. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

# २२ जानेवारीला खारघर मॅरेथॉन; धावपटू देणार व्यसनमुक्तीचा संदेश

### सेलिब्रिटी आणि मान्यवरांची लाभणार उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २२) 'एक धाव व्यसनमुक्तीसाठी' हे सामाजिक हिताचे घोषवाक्य घेऊन खारघर मॅरेथॉन २०२३ ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

खारघर सेक्टर १९मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून या स्पर्धेला सकाळी ६ वाजता मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून सुरुवात होणार असून पारितोषिक वितरण समारंभही त्याच ठिकाणी सकाळी ९ वाजता होईल. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या स्पर्धेसाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सेलिब्रिटींची मांदियाळी लाभणार आहे.

सन २००६ साली लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल मॅरेथॉनच्या अनुषंगाने या स्पर्धेला प्रारंभ झाला. उत्तम आणि नीटनेटक्या आयोजनामुळे ही स्पर्धा सातत्याने यशस्वी होत आली आहे. यापूर्वीच्या मॅरेथॉन स्पर्धा 'रन अगेन्स्ट एड्स', 'पर्यावरणाच्या संरक्षणासाठी धावूया', 'एक धाव आरोग्यदायी पनवेलसाठी', 'रन फॉर निर्भय भारत', 'सद्भावना दौड', 'एक धाव पाणी बचतीसाठी', 'स्त्री-भ्रूणहत्येविरोधात एक धाव', 'एक धाव महिलांच्या सन्मानासाठी', 'रन टू प्रमोट कॅशलेस ट्रान्झॅक्शन', 'हम फिट तो इंडिया फिट' अशी घोषवाक्य घेऊन उत्स्फूर्त प्रतिसादात झालेल्या आहेत.

सामाजिक व शारीरिक हित जोपासले जात उत्कृष्ट व सुयोग्य नियोजन आणि वेगवेगळ्या सामाजिक संदेशासाठी प्रसिद्ध असलेल्या या स्पर्धेने लोकप्रियतेची शिखरे गाठली आहेत. यंदाची ही स्पर्धा १३वी आहे.

स्पर्धेत दोन लाख रुपयांची बक्षिसे आहेत तसेच स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. यातील पुरुष खुला गट व महिला खुला गटासाठी १०० रुपये, तर उर्वरित गटांसाठी २० रुपये नाममात्र प्रवेश फी असणार असून ही प्रवेश फी सामाजिक उपक्रमासाठी वापरली जाते. त्याचप्रमाणे शाळा व गृहसंकुल सोसायट्यांना खेळांमध्ये भाग घेण्यासाठी उत्तेजन देता यावे यासाठी त्यांना प्रवेश शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

### विविध गट

**स्पर्धा पुरुष खुला गट १० किलोमीटर अंतर, महिला खुला गट १० किमी, १७ वर्षाखालील मुले गट ५ किमी, १७ वर्षाखालील मुली गट ५ किमी, १४ वर्षाखालील मुले गट ५ किमी, १४ वर्षाखालील मुली गट ५ किमी तसेच खारघर दौड गट ३ किमी आणि सिनिअर सिटीझन दौड २ किमी अशा आठ गटांत होणार आहे.**

स्पर्धा दरवर्षीप्रमाणे यशस्वी करण्यासाठी आयोजन, स्वागत, प्रसिद्धी, मार्ग नियोजन, प्रवेशिका देणे व घेणे, पंच व नियमावली, फिडिंग व स्पंजिंग, साहित्य, नियंत्रण, मार्ग आखणी, प्रथमोपचार, बक्षीस वितरण अशा विविध समित्या असणार आहेत. स्पर्धेत सहभाग घेण्याची अंतिम तारीख १५ जानेवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत असून चेस्ट नंबर १८ जानेवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्पर्धकांनी घेऊन जाणे अनिवार्य आहे. (पान २ वर..)

## निवडक

### मुंबईत लिफ्ट कोसळून दोन जणांचा मृत्यू

**मुंबई :** विक्रोळी येथे लिफ्ट कोसळून एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच सोमवारी (दि. ९) वरळीतदेखील अशीच एक घटना घडली. वरळीतील अविघ्न हाऊस मायानगर येथील एका इमारतीत लिफ्ट कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला आहे. लिफ्ट बसविण्याचे काम सुरू असताना ही दुर्घटना घडली.

### पंजाबमधील तीन शुटर्सना कल्याण येथून अटक

**कल्याण :** पंजाबमधील गँगस्टर तथा दहशतवादी हरविंदर सिंग उर्फ सोनू खत्री गँगमधील तीन कुख्यात शार्प शुटर्सना कल्याणजवळील आंबिवली येथील यादवनगर परिसरातून अटक करण्यात आली आहे. पंजाब अँटी गँगस्टर टास्क फोर्स, मुंबई एटीएस आणि खडकपाडा पोलिसांनी सोमवारी (दि. ९) पहाटे ४च्या सुमारास संयुक्तपणे ही कारवाई केली. पकडलेल्या गुंडांवर खुनासह अनेक गुन्हे दाखल आहेत.

## काशीद समुद्रात बुडून दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू

### औरंगाबादची सहल; तिघे बचावले



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशीद समुद्रात बुडून औरंगाबादमधून सहलीला आलेल्या दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. ९) घडली, तर तिघांना वाचविण्यात यश आले.

सध्या मुरूड तालुक्यातील पर्यटनस्थळांवर राज्यातून मोठ्या प्रमाणात शालेय सहली येत आहेत. अशाच प्रकारे औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड येथील सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची सहल सोमवारी काशीद येथे आली होती. सुमारे ८० विद्यार्थ्यांचा समूह दुपारी ३च्या सुमारास काशीद समुद्रकिनारी उतरला होता. यापैकी पाच विद्यार्थी समुद्रात पोहण्यासाठी गेले. पोहता पोहता हे पाचही जण खोल पाण्यात गटांगळ्या खाऊ लागले. जवळच असणाऱ्या लोकांना मुले बुडत असल्याचे लक्षात येताच त्यांनी पाण्यात उड्या टाकल्या व पाचपैकी तिघांना किनारी सुखरूप आणले.

उर्वरित दोन विद्यार्थी खोल पाण्यात गेल्याने त्यांना वाचवणे शक्य झाले नाही. यापैकी एकाचा मृतदेह त्वरित सापडला, तर दुसरा मुलगा सापडत नव्हता. यासाठी स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या मदतीने शोधकार्य सुरू ठेवल्यानंतर काही तासानंतर दुसऱ्याचाही मृतदेह सापडला. प्रणव कदम व रोहन बेडवाल अशी त्यांची नावे असून त्यांचे वय सुमारे १५ वर्षापर्यंत असल्याचे सांगण्यात आले, तर रोहन महाजन, कृष्णा पाटील, तुषार वाघ यांना वाचविण्यात यश आले. त्यांना उपचारासाठी बोर्ली प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले आहे.

# रायगड पोलीस दलाला यंदाही पुरस्कार



(छाया : जितू शिगवण)

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालकांतर्फे २०२१ या वर्षासाठी बेस्ट पोलीस युनिट पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यात रायगड पोलीस दलाने द्वितीय क्रमांक मिळविला आहे. सलग दुसऱ्या वर्षी रायगड पोलीस दलाने हा पुरस्कार मिळवला, अशी माहिती रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सोमवारी (दि. ९) पत्रकार परिषदेत दिली. अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे सोबत होते.

पोलीस दलाने विविध पातळ्यांवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालकांतर्फे उत्कृष्ट पोलीस युनिट पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. राज्यात पोलीस घटकांची कार्यक्षमता आणि कामगिरी वाढविणे, दिलेल्या मर्यादेत उत्कृष्ट पद्धतीने काम करणे तसेच गुन्हेगारीला प्रतिबंध आणि गुन्ह्याचा तपास, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टिकोनातून संबंधित पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रोत्साहित करणे या हेतूने हा पुरस्कार दिला जातो.

पोलीस दलामार्फत गेल्या वर्षभरात केलेल्या कामांचे मूल्यांकन करून पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. वर्षभरात दाखल गुन्हे, पोलिसांनी दाखल गुन्ह्यांची केलेली उकल, तपास कौशल्य, पोलिसांची नागरिकांशी असलेली वागणूक यासारख्या बाबींचा विचार यात करण्यात आला आहे.

**या यशाचे श्रेय माझ्या एकट्याचे नसून संपूर्ण रायगड पोलीस दलाचे आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामगिरीमुळेच हे यश मिळाले आहे. तत्कालीन पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांचेही यात मोठे योगदान आहे. २०२२चाही पुरस्कार मिळवून आम्ही हॅट्ट्रिक करू.**
**-सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

# दापोली संघ आमदार चषकाचा मानकरी



अधिक छायाचित्र पान ८ वर..

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नावडे येथील जय हनुमान क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक २०२३ टेनिस क्रिकेट स्पर्धेत दापोलीच्या जय हनुमान क्रिकेट संघाने प्रथम क्रमांक पटकाविला, तर किरवलीचा ओम नर्मदेश्वर संघ द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

नावडे येथील मैदानावर चार दिवस ही स्पर्धा रंगली. उत्तम आयोजन आणि क्रिकेटचा थरार या स्पर्धेदरम्यान क्रीडारसिकांना पहायला मिळाला. या स्पर्धेला पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी भारतीय संघातील आंतरराष्ट्रीय माजी क्रिकेटपटू व आयपीएल प्रशिक्षक संजय बांगर यांची विशेष उपस्थिती लाभली.

या स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या जय हनुमान दापोली संघास एक लाख रुपये व आकर्षक चषक, उपविजेत्या किरवलीच्या ओम नर्मदेश्वर संघास ५० हजार रुपये व चषक तसेच तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या गावदेवी खर्डी संघाला आणि चतुर्थ क्रमांक मिळविलेल्या दक्षता ११ कानपोली संघाला प्रत्येकी २५ हजार रुपये व आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेत मालिकावीराचा मान ओम नर्मदेश्वर संघाच्या मंगेश पाटील या अष्टपैलू खेळाडूने पटकाविला. त्याला रेफ्रिजिरेटर बक्षीस देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजक व प्रसिद्ध क्रिकेटपटू प्रशांत खानावकर व सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## 'महाराष्ट्र केसरी'चा आजपासून थरार

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार मंगळवार (दि. १०) पासून पुण्यात रंगणार आहे. या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत १० ते १४ जानेवारीपर्यंत ९०० पैलवान आपली ताकद दाखवितील.

पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीगीर योगेश्वर दत्त यांच्या हस्ते मंगळवारी सायंकाळी ६ वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती 'महाराष्ट्र केसरी'चे प्रमुख संयोजक माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

स्पर्धेची जय्यत तयारी करण्यात आली असून कोथरूड येथील कुस्तीमहर्षी स्व. मामासाहेब मोहोळ क्रीडानगरी पैलवान आणि कुस्तीप्रेमींच्या मेळ्यासाठी सज्ज झाली आहे.



(छाया : संकेत भोईर)

# शिष्यवृत्ती परीक्षेत 'सीकेटी'चे सुयश

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा राखत पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी मारली आहे. सीकेटी विद्यालयातील १५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले तसेच त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सीकेटी पूर्व प्राथमिकच्या धवल पाटील, वेदांत बोंबले, वेद बागवे, मयंक म्हामुणकर, अथर्व पाटील, गायत्री बालशी, तनिष्का गावडे, ज्ञानदा सुर्वे यांना, तर पूर्व माध्यमिकच्या पूजा नामे, सृष्टी पाटील, जिनल वालावलकर, श्रावणी थळे, ओंमकार धर्माधिकारी, निधी मेहतर, आर्या यशवंतराव या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्यांना शुभेच्छा देतेवेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण उपस्थित होते.

# कामांचा दर्जा तपासून नवी कामे द्या -मुख्यमंत्री

## जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळ बैठकीत सूचना



**मुंबई : प्रतिनिधी**

जलसंधारणाची विविध कामे कंत्राटदारांना देताना त्यांनी केलेल्या पूर्वीच्या कामांचा दर्जा तपासून मगच त्यांना नवीन कामे देण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

दरम्यान, जलसंधारण महामंडळाकडील कंत्राटदार नोंदणीची जुनी पद्धत तत्काळ बदलून नवी पारदर्शक, खुली प्रक्रिया राबवून निकष पूर्ण करणाऱ्या कंत्राटदारांची नोंदणी करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. ९) झाली. बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, मृद व जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सु. पां. कुशारे आदी उपस्थित होते.

जलसंधारण महामंडळांतर्गत ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या जलसंधारण योजनांच्या मुख्य कामे, इतर बांधकामांच्या २२५ निविदांना सर्वसाधारण मान्यता देण्याच्या विषयावर या वेळी चर्चा करण्यात आली. या प्रस्तावाचा उच्चस्तरीय समितीने अभ्यास करून त्यानंतर निर्णय घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या. महामंडळाकडे प्राप्त झालेल्या ८५ कंत्राटदारांच्या नोंदणीस मान्यता देतानाच यापुढे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्तरावर निकष तपासून कंत्राटदार नोंदणीला मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### आवश्यकता असलेल्या ठिकाणी कामे घ्या -उपमुख्यमंत्री

**जलसंधारणाच्या कामांची राज्यात जिथे आवश्यकता आहे, अशा ठिकाणी जलसंधारण महामंडळाने कामे घेण्यावर भर देण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.**

# लव्ह जिहादविरोधात कठोर कायदा आणावा

## भाजप नेते आशिष शेलार यांची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

गोहत्या, लव्ह जिहाद आणि धर्मांतरविरोधी कायदा लागू करावा या मागणीसाठी तसेच हिंदू धर्मियांवरील अन्याय, अत्याचारविरोधात सकल हिंदू समाजाच्या वतीने राज्यात मागील काही दिवसांत अनेक ठिकाणी मोर्चे निघाल्याचे दिसून आले आहे. लव्ह जिहादविरोधात कठोर कायदा आणला जावा, अशी प्रामुख्याने मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर भाजप नेते आशिष शेलार यांनीदेखील भूमिका मांडली आहे.



लव्ह जिहादशी संबंधित घटनांमुळे सामाजिक बांधिलकी आणि ऐक्याला तडा जात आहे. त्यामुळे लव्ह जिहादविरोधात राज्य सरकारने कायदा बनवावा आणि समस्त नागरिकांनी या कायद्याला समर्थन द्यावे, असे शेलार यांनी ट्विटमधून म्हटले आहे. निर्लज्जपणाचा हा कळस आहे. आमच्या मुली, महिला, भगिनींवर जी काय माहितीसमोर येते आहे, त्यातून स्पष्ट दिसतेय किंवा त्यातून आपण अर्थ काढू शकतो तो म्हणजे एका विशिष्ट वर्गाकडून रोज अन्याय अत्याचार होत आहेत. हिंदू मुली या लोकांना खेळायचे साधन वाटायला लागल्या आहेत का?, त्यांच्यावर अन्यायच करावा, असे वाटायला लागले आहे की, काय? असा आशिष शेलार यांनी संतप्त सवाल उपस्थित केला.

याशिवाय, लव्ह जिहादच्या घटना सामाजिक बांधिलकीला, सामाजिक एकतेला आता बाधा निर्माण करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र सरकारनेसुद्धा लव्ह जिहादच्या प्रकरणात सकारात्मक भूमिका घेतली आहे. इथपर्यंत थांबून चालणार नाही, कायदा बनवावाच लागेल, माझे आवाहन असेल की, राज्यातील समस्त नागरिकांनी त्या कायद्याला समर्थन द्यावे.

# दिराने केला वहिनीवर बलात्कार

## खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील हाळ गावात एका कुटुंबात दिराने आपल्या वाहिनीवर बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात पीडित महिलेने बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सविस्तर मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही आरोपी आसमत इलायत शेख याच्या भावाची पत्नी असून नात्याने वहिनी आहे. पीडितेने पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, तिचे पती चालक म्हणून काम करीत असल्याने ते कामावर गेल्यावर ती घरात एकटीच असताना आरोपी दिराने मे २०२२मध्ये पीडितेला तुमच्याशी महत्त्वाचे बोलायचे आहे, तुम्ही घराच्या मागच्या बाजूला या, असे सांगितले. दिराच्या सांगण्यावरून पीडित महिला भेटण्यासाठी गेल्या असता, तुमचे गावात अनेकांबरोबर अनैतिक संबंध आहेत हे मला माहिती आहे. ही गोष्ट मी तुझ्या नवऱ्याला सांगेन, अशी धमकी दिली व पीडितेकडे शरीरसुखाची मागणी केली. पीडितेने नकार दिल्यावर त्यांच्यावर आरोपी दिराने जबरदस्ती बलात्कार केला. यानंतर ७ जानेवारी २०२३ रोजी दिराची पत्नी सकाळी पीडितेच्या घरी येऊन तिच्या पतीला, तुझी बायको माझ्या नवऱ्याला रोज फोन करते, असे सांगितले. पीडितेच्या पतीने पीडितेला धीर दिल्याने त्यांनी घडलेला प्रकार पतीला सांगितला. त्यानंतर पतीच्या सहकार्याने पीडित महिलेने पोलिसांत तक्रार दिली आहे. खालापूर पोलिसांनी आसमत शेख याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला असून आरोपी फरार झाला आहे.



## नेरूळमध्ये उत्पन्न दाखला शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंतीनिमित्त बाळासाहेबांची शिवसेना, नवी मुंबई यांच्या वतीने माजी उपमहापौर अशोक गावडे आणि ॲड. माजी नगरसेविका स्वप्ना गावडे- गायकवाड यांच्या वतीने ११ व १२ जानेवारीदरम्यान विद्यार्थ्यांसाठी मोफत उत्पन्न दाखला शिबिर नेरुळमधील पक्षाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात आयोजित केले आहे.

प्रभाग क्रमांक ९८ व १०९मधील विद्यार्थी व पालकांनी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सोलर रुफटॉप योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**भांडूप : प्रतिनिधी**

सध्या देशात सौरउर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक प्रयत्न सुरू आहेत. केंद्र तसेच राज्य शासनाने सौरउर्जेचा वापर करण्यासाठी ग्राहकांना आवाहन करीत आहे. महावितरणनेसुद्धा या कामात हातभार लावण्यासाठी महावितरणची छतावरील (रुफटॉप) सौरउर्जा योजना आणली आहे. या योजनेंतर्गत महावितरणच्या ग्राहकांना छतावरील (रुफटॉप) सौरउर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळत आहे.

सौरउर्जा निर्मिती यंत्रणेमुळे मासिक घरगुती वीजबिलात मोठी बचत होऊन, नेटमिटरिंगद्वारे महावितरणकडून वर्षाअखेर शिल्लक वीजदेखील विकत घेतली जाते. अनेक ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतले आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी केंद्र शासनाने नॅशनल पोर्टल फॉर सोलर रुफटॉपचे अनावरण जुलै २०२२मध्ये केले असून या पोर्टलवर ग्राहक भारतामधून कुठूनही सोलर रुफटॉपसाठी अर्ज करू शकतो. ही योजना ग्राहकांसाठी फायद्याची असून, या योजनेमुळे रोहित्र वरचा ताण ही कमी होतो.

या योजनेमधून घरगुती वर्गवारीतील ग्राहकांना किमान एक किलोव्हॅट क्षमतेची छतावरील सौरउर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून वित्त सहाय्य देण्यात येत आहे. एक ते तीन किलोव्हॅटपर्यंत ४० टक्के आणि तीन किलोव्हॅटपेक्षा अधिक ते १० किलोवॅटपर्यंत २० टक्के अनुदान देण्यात येते, तसेच सामुहिक वापरासाठी ५०० किलोवॅटपर्यंतें परंतु प्रत्येक घरासाठी १० किलोव्हॅट मर्यादेसह गृहनिर्माण रहिवासी संस्था व निवासी कल्याणकारी संघटनांना २० टक्के अनुदान देण्यात येते.

रुफटॉप सौरउर्जा निर्मिती यंत्रणा आस्थापित करण्यासाठी ऑनलाईन अर्ज महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. या यंत्रणेला लावण्यात आलेल्या नेटमिटरिंगद्वारे वर्षाअखेर शिल्लक वीज प्रति युनिटप्रमाणे महावितरणकडून विकत घेतली जाईल. त्याचाही आर्थिक फायदा संबंधीत घरगुती ग्राहकांना होणार आहे. सोबतच सौरयंत्रणा उभारणीच्या खर्चाची साधारणतः तीन ते पाच वर्षांत परतफेड होणार आहे. दरमहा वीजबिलातील आर्थिक बचत तसेच पर्यावरणस्नेही ग्राहक म्हणून कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी महावितरणच्या घरगुती वर्गवारीतील वीजग्राहकांनी रुफटॉप सौर ऊर्जा योजनेचा लाभ घेऊन पर्यावरण रक्षणात सहभागी व्हावे, असे आवाहन महावितरण भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी केले आहे.

# 'सीकेटी'त संवाद कौशल्य व प्रभावी प्रशासनावर परिसंवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) महाविद्यालयात रौप्य महोत्सवाचे औचित्य साधून प्रशासकीय कार्यालय आणि इंग्जी विभाग यांनी संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत शनिवारी (दि. ७) प्रभावी प्रशासनासाठी आवश्यक संवादाची सुलभ कौशल्ये यावर परिसंवादाचे आयोजन केले होते.



या परिसंवादासाठी रुसाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. पी. एन. पाब्रेकर, एचआर सल्लागार ज्योति रंजन, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, एचआर सल्लागार सुजाता ज्योति रंजन हे प्रमुख पाहुणे लाभले होते. प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी संवाद कौशल्य व प्रभावी प्रशासन याचे महत्त्व विषद केले.

डॉ. पी. एन. पाब्रेकर यांनी, प्रशासकीय कर्मचारी हे महाविद्यालयीन प्रशासनाचा मुख्य स्तंभ असून प्रशासकीय सेवांचा दर्जा त्यांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. त्यामुळे प्रशासकीय कर्मचाऱ्यांना उच्च शिक्षणामध्ये सातत्याने होत असलेले बदल अवगत करून देण्यासाठी विविध विषयांवर परिसंवाद व कार्यशाळांचे आयोजन करणे महत्त्वाचे आहे, तसेच येऊ घातलेल्या नवीन शैक्षणिक धोरण २०२०वरसुद्धा प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी कार्याशाळेचे आयोजन करणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

महाविद्यालयातील आणि इतर महाविद्यालयातील ११९ प्रशासकीय कर्मचारी प्रत्यक्ष तर १२८ प्रशासकीय कर्मचारी हे आभासी माध्यमाने असे एकूण २४७ प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. परिसंवादाचे सूत्रसंचालन तानाजी देशमुख, प्रास्ताविक डॉ. आर. व्ही. येवले, तर आभार प्रदर्शन जी.के. सुर्वे यांनी केले. या परिसंवादाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस.एन. वाजेकर यांनी शुभेच्छा दिल्या.



**मुंबई : राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या सदस्य सय्यद शहजादी (केंद्रीय मंत्री दर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात बैठीकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांचा सत्कार करताना प्रदेशाध्यक्ष तथा हज कमिटी सदस्य हाजी एजाज देशमुख, ज्येष्ठ नेते राकेश जैन, मुंबई अध्यक्ष वसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, हज कमिटी सदस्य सलीम बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आदील पटेल, प्रदेश उपाध्यक्ष महेबुब खेरवा आदी.**

पान १ वरून

## २२ जानेवारीला खारघर मॅरेथॉन; धावपटू देणार व्यसनमुक्तीचा संदेश

स्पर्धेची नाव नोंदणी संकेतस्थळ www.khargharmarathon.in तसेच ७७५७०००००० या क्रमांकावर मिस्ड कॉल आदी ऑनलाईन पद्धतीने करता येणार असून अधिक माहितीसाठी ०२२२७७४४४१०, ०२२२७७४४५७७, ०२२६८५७४४०१, ०२२६८५७४४०२, ०२२६८५७४४०७, ८०८०४३१०४५ किंवा ७५०२९००१०० या क्रमांकावर संपर्क साधावा आणि या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धक, क्रीडारसिक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन स्पर्धा प्रमुख व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

**गटवारी आणि बक्षिसांचा तपशील**

**पुरुष खुला गट (अंतर १० किलोमीटर)**

प्रथम क्रमांक २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक १५ हजार रुपये, तृतीय क्रमांक १० हजार रुपये, उत्तेजनार्थ सात स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये तसेच सर्व विजेत्यांना ट्रॅक सूट. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.

**महिला खुला गट**
**(अंतर १० किलोमीटर)**

प्रथम क्रमांक २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक १५ हजार रुपये, तृतीय क्रमांक १० हजार रुपये, उत्तेजनार्थ सात स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये तसेच सर्व विजेत्यांना ट्रॅक सूट. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.

**१७ वर्षांखालील मुले गट**
**(अंतर ५ किलोमीटर)**

प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ३ हजार रुपये, तृतीय क्रमांक २ हजार रुपये तसेच १० उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.

**१७ वर्षांखालील मुली गट**
**(अंतर ०५ किलोमीटर)**

प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ३ हजार रुपये, तृतीय क्रमांक २ हजार रुपये तसेच १० उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.

**१४ वर्षांखालील मुले गट**
**(अंतर ५ किलोमीटर)**

प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ३ हजार रुपये, तृतीय क्रमांक २ हजार रुपये तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.

**१४ वर्षांखालील मुली गट**
**(अंतर ५ किलोमीटर)**

प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ३ हजार रुपये, तृतीय क्रमांक २ हजार रुपये तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.

**खारघर दौड (अंतर ३ किलोमीटर)**

स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.

**सिनिअर सिटीझन दौड**
**(अंतर २ किलोमीटर)**

प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ३ हजार रुपये, तृतीय क्रमांक २ हजार रुपये तसेच सात उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.

## माजी नगरसेवक सिद्धार्थ बांठिया भाजपमध्ये

या कार्यक्रमास भाजपचे पनवेल शहराध्यक्ष जयंत पगडे, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, बबन मुकादम, हरेश केणी, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका चारुशीला घरत, शहर खजिनदार संजय जैन यांच्यासह कपिल बोरा, निखिल मुनोथ, देवेंद्र अचलिया, भाविन जैन व सिद्धार्थ बांठिया यांचे समर्थक उपस्थित होते. तत्कालीन पनवेल नगर परिषदेत सिद्धार्थ बांठिया यांनी बांधकाम सभापती म्हणून उत्कृष्ट काम केले आहे.

## दुखवटा

### रघुनाथ ठाकूर

**उरण :** खोपटे द. पी. पाडा येथील सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ अनंत ठाकूर (६१) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, चार भाऊ व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि. १४) खोपटे खाडी येथील नाना-नानी पार्क येथे तर उत्तरकार्य राहत्या घरी खोपटे द. पी. पाडा येथे रविवारी (दि. १५) करण्यात येणार असल्याचे त्यांचे धाकटे बंधू यशवंत ठाकूर यांनी सांगितले आहे.



### गणपत माळी

**उरण :** बालई येथील प्रमोद माळी यांचे वडील गणपत हरिश्चंद्र माळी यांचे वयाच्या ७८ वर्षी अल्पशा आजाराने सोमवारी (दि. २) निधन झाले. त्यांच्यावर बालई येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवारी (दि. ११) सकाळी ८ वाजता माणकेश्वर येथे, तर दिवसकार्य शुक्रवारी (दि. १३) सकाळी १० वाजता राहत्या घरी करण्यात येणार आहे.




## चौकशीची जाहीर नोटीस

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग रायगड

न्यास नोंदणी अर्ज क्रमांक :-४७२/२०२२

जा.क्र. न्यायशाखा/४१/२३
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफीसजवळ
अलिबाग, जि. रायगड
दि. ०५/०१/२०२३

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- **''माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान'', मालमत्ता क्र. ४०७, आशीर्वाद, आमराई, ता. कर्जत, जि.रायगड ...** बाबत.

**श्री मुकेश तुकाराम सुर्वे** .......अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत :-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम रु.७०००/- खजिनदार श्री. विजय भाऊराव मांडे यांच्या ताब्यात राहील.
(ब) स्थावर मिळकत :- (वर्णन) निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड यांचे शिक्कयानिशी आज दिनांक :- **०५/०१/२०२३** रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**(श्रीम. अंजली रमेश पिसाळ)**
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

## निवडक

### विवाहितेसह चिमुकली बेपत्ता



**पनवेल :** शहरातील तक्का येथून एक विवाहिता आपल्या १ वर्षाची चिमुकलीसह कोठेतरी निघुन गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रूजगारीबाई पप्पी गारदी (वय २१) असे या महिलेचे नाव आहे. तिची उंची ४ फुट ५ इंच, रंग गोरा, अंगाने सडपातळ, चेहरा, उभट नाक, केस छोटे पसरट व काळे असून अंगात हिरव्या रंगाचा टॉप, हिरव्या कलरची पॅन्ट, पायात काळया रंगाची चप्पल, सोबत छोटी पर्स असा पेहराव आहे. तसेच तिच्यासोबत तिची एका वर्षाची चिमुकली कुवरजादी सोबत असून दोघेही कोठेतरी निघुन गेल्याने ती हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र.०२२२७४५२३३३ किंवा पोलीस नाईक अतुल देवकर यांच्याशी संपर्क साधावा.

### पनवेल आगारात रस्त्याची डागडुजी



**पनवेल :** येथील एसटी आगारातील खड्डे भरण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. विविध संघटनांनी प्रवाशांना येथे अनंत अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे लक्षात आणून दिल्यावर आगारातील खड्डे भरून देण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामांमुळे येथून ये-जा करणाऱ्या नागरिकांनी समाधान व्यक्त करीत प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# रसायनीत पॅसेंजर ट्रेनला थांबा हवा

## नागरिकांची प्रशासनाकडे मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी रेल्वे स्टेशनला पॅसेंजर ट्रेन थांबत नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. रेल्वे रसायनी थांब्यावर थांबविण्यात याव्यात, असे रेल्वे प्रशासनाला नागरिकांतून मागणी होत आहे.

रसायनी परिसरातील पाताळगंगा औद्योगिक परिसर, बिपिसीएल कंपनी, इस्रो कंपनी, तसेच पिल्लई कॉलेज, व इतर शाळा, त्यासोबतच निवासी वसाहती यातील नागरिक शालेय विद्यार्थी मोठ्या प्रमाणात मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि कोकणात ये-जा करणारे चाकरमानी यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सकाळी ७.४५ च्या सुमारास दिवाहुन सावंतवाडी जाणारी पॅसेंजर आणि दुपारची १२.३० च्या सुमारास रत्नागिरी दिवा ही पॅसेंजर येथे थांबत नसल्याने प्रवाशी, विद्यार्थी आणि नोकरवर्ग यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहे.

लॉकडाऊन अगोदर नियमितपणे रेल्वे रसायनी रेल्वे थांब्यावर थांबत होत्या. सध्या रसायनी थांबा घेतच नसल्याने या रेल्वे रसायनी थांब्यावर थांबविण्यात याव्यात, असे रेल्वे प्रशासनाला नागरिकांतून मागणी होत आहे. तसेच ज्या रेल्वे थांबत आहेत, त्यांचे तिकीट मिळण्याची सोयही इथे उपलब्ध नसल्याने पनवेल इथे पकडले गेल्यास फुकट भुर्दंड सोसावा लागत आहे. तसेच रसायनी ते पनवेल हे प्रवासी भाडे १० रुपये तरी कोरोना काळात स्पेशल ट्रेनसाठी लावलेले ३० रुपये भाडे अजून तसेच असल्याने प्रवाशांना नाहक जास्तीचे भाडे सोसावे लागत आहे. हे वाढलेले भाडेवाढ त्वरित मागे घ्यावी, अशी प्रवाशांकडून मागणी होताना दिसत आहे.





**पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका डॉ. हेमलता रवी गोवारी यांनी त्यांच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात अनेक विकासाची कामे करून नागरिकांना सुविधा देण्याचे काम केले तसेच त्यांनी नागरिकांना भेडसवणाऱ्या समस्यांबाबत सिडको आणि महापालिकेकडे पाठपुरावा करून त्या सोडवल्या. या पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या कार्याचा अहवाल जारी केला आहे. या अहवालाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. या वेळी वैशाली जगदाळे, युवा मोर्चाचे उपाध्यक्ष तेजस जाधव, जयकुमार डिगोळे आदी उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)



**पनवेल : श्री संत वामनभाऊ व भगवानबाबा पुण्यतिथी सोहळा खांदा कॉलनी येथे आयोजित करण्यात आला आहे. पोलीस ठाण्यासमोरील मैदानात या सोहळ्यानिमित्त ७ ते १४ जानेवारीदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत रविवारी हभप पांडुरंग महाराज डोंगरेश्वर संस्थानच्या वतीने कीर्तन सादर केले. या वेळी माजी उपमहापौर सीताताई पाटील व अन्य मान्यवर उपस्थित होते. त्यांनी महाराजांचे स्वागत व सन्मान केला.** (छाया : योगेश पाटील)

# खारघरमध्ये आयुर्वेदिक आरोग्य केंद्र सुरू

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

(छाया : संकेत भोईर)





**खारघर : रामप्रहर वृत्त**

यु नारायण फाउंडेशन आणि अटल फाउंडेशन यांच्या वतीने खारघर सेक्टर १९ येथे मनोज. बी. पाटील यांनी आयुर्वेदिक आरोग्य केंद्र सुरू केले आहे. या केंद्राचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ८) झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनोज.बी.पाटील यांचं अभिनंदन करत त्यांना पुढील यशस्वी वाटचाली करीत शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, या केंद्राच्या उद्घाटनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याला उत्तर प्रतिसाद लाभला. या वेळी भाजपचे खारघर तळोजा मंडळ अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिता पाटील, डॉक्टर प्रदीप चौधरी, अॅड. मयूरा मारू, प्रेम नारायण, मनोज राजपूत, नवनीत पुरषोत्तम मारू, जे. जे.पिंगळे, जितेंद्र मिस्त्री आदी उपस्थित होते.

## नावडे कॉलनी येथे महिलेची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील नावडे कॉलनी येथील एका विवाहितेने अज्ञात कारणावरून राहत्या घरातील छताचे सिलिंग फॅनला ओढणीचे साह्याने गळफास लावुन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद तळोजे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

नावडे येथील शिवगणेश इमारतीत राहणाऱ्या सुशिला विजय पार्टे (वय ३५) यांनी राहत्या घरातील छताचे सिलिंग फॅनला ओढणीच्या सहाय्याने गळफास लावुन आत्महत्या केली. या प्रकारची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गुंतवणुकीच्या बहाण्याने लाखोंची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

क्राईन झेड एक्स या कंपनीमध्ये पैसे गुंतवल्यास मोठा आर्थिक मिळेल, असे आमिष दाखवून एका टोळीने पनवेलसह मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरातील शेकडो लोकांकडून लाखो रुपये स्वीकारल्याचे उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे या कंपनीला व त्यांच्या गुंतवणुकीच्या स्किमला भारत सरकार व आरबीआय अथवा इतर सरकारी कार्यालयाची कोणतीही परवानगी नसताना त्यांनी बेकायदा गुंतवणुकीची स्किम सुरू केल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे खांदेश्वर पोलिसांनी या टोळीविरोधात फसवणुकीसह अपहार करणे, तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थांमधील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हा दाखल केलेल्यांमध्ये सनी पगारे, देवेंद्र विश्वकर्मा, गुलशन वर्मा व इतरांचा समावेश असून या टोळीने गत ऑगस्ट महिन्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी सेमिनार घेऊन क्राईन झेड एक्स या कंपनीच्या स्किमची जाहिरात केली होती. तसेच कंपनीच्या ट्रस्ट वॉलेट या अँपच्या माध्यमातून त्यांच्या स्किममध्ये गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदाराला कंपनीच्या वतीने कमी कालावधीत मोठ्या स्वरूपात आर्थिक लाभ होईल, असे आमिष दाखविले होते. या आमिषाला बळी पडून शेकडो लोकांनी लाखो रुपये गुंतविले होते. त्यांच्यापैकीच कांदिवली चारकोप येथे राहणारा मोहम्मद आरिफ यानेही या स्किममध्ये चार लाख ५६ हजार रुपये गुंतवले होते. मोहम्मदने केलेल्या गुंतवणुकीपोटी त्याला ४० डॉलर मिळतात असे दाखविण्यात आले होते, मात्र ही रक्कम त्याला वापरता येत नव्हती, तसेच ती रक्कम त्याला भारतीय चलनामध्ये कन्वर्ट करता येत नव्हते. तसेच त्या रकमेतून त्याला कोणत्याही प्रकारची खरेदी देखील करता येत नव्हती. त्यामुळे मोहम्मदने आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली होती. मात्र या टोळीकडून पैसे देण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. गुंतवणुकीची स्किम ही फसवी असल्याचे लक्षात येताच त्याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# लेखा शिक्षण आणि संशोधनाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती

## सीकेटी महाविद्यालयात महत्त्वपूर्ण परिसंवाद

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स महाविद्यालयातील लेखा विभाग व लेखा आणि वित्त विभाग यांच्या समन्वयाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियाना अंतर्गत ६ आणि ७ जानेवारीला डिजिटल युगातील लेखा शिक्षण आणि संशोधन या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.



या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे आय. टी.एम. येथील वित्त आणि धोरण अभ्यास केंद्रच्या प्रमुख सनदी लेखापाल डॉ. पिंकी अगरवाल व ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्समधील विभागप्रमुख डॉ.निशिकांत झा उपस्थित होते. तसेच या वेळी संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख मा. डॉ. एस. बी. यादव ,वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. एलीझाबेथ मॅथ्युज, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, लेखा आणि वित्त विभागाचे प्रमुख डॉ. एन. इ. कोळी यांनी उपस्थिती दर्शविली.

या वेळी पहिल्या सत्रात डॉ. पिंकी अगरवाल यांनी डिजिटल युगात लेखा आणि लेखापरीक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रक्रियेचा वापर, कर आकारणी क्षेत्रात डिजिटलायझेशन, डिजिटल अकाउंटिंगसाठी अकाउंटिंग सॉफ्टवेअर, डिजिटल युगातील लेखा आव्हाने इत्यादी विषयांवर माहिती दिली. तसेच उदयोन्मुख लेखा क्षेत्र , स्थिरता लेखांकन, ग्रीन अकाउंटिंग या बदल माहिती दिली.दुसऱ्या सत्रात डॉ. निशिकांत झा यांनी संशोधन आणि नव उपक्रमाचे महत्त्व, डिजिटल युगातील संशोधन व संशोधन कार्यप्रणाली या बद्दल माहिती दिली. यानंतर २० सहभागींचे शोध सादरीकरण घेण्यात आले. त्यासाठी परीक्षक म्हणून पिल्लई कॉलेज ऑफ सायन्स अॅण्ड कॉमर्स येथील लेखा विभागाच्या प्रा. डॉ. मोनाली रे, डॉ. एकनाथ झरेकर व शंकर नारायण कॉलेज ऑफ आट्र्स अॅण्ड कॉमर्स, भायंदर येथील प्राचार्य डॉ. व्ही. एन. यादव आणि पाठक एच.डी.चे सहाय्यक व्यवस्थापक (लेखापरीक्षण) सनदी लेखापाल कुंदन आंग्रे उपस्थित होते.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाविषयी माहिती दिली व संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे यांनी त्यांच्या संबोधनात अकाउंटन्सीमध्ये डिजिटल युगाचे महत्त्व सांगितले तसेच वाणिज्य शाखेचे प्रमुख डॉ. एस. बी. यादव यांनी परिसंवादाचा परिचय करून दिला.या परिसंवादाचे सूत्रसंचालन लेखा आणि वित्त विभागाच्या प्रा. मोनिका भालेराव यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे आभार लेखा आणि वित्त विभागाचे प्रा. मनोज सुपेकर व प्रा. रत्नावली लिमये यांनी मानले.

# रामबागमध्ये सुरेल गाण्यांची मैफिल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दुबईच्या धर्तीवर न्हावे खाडी येथे उभारण्यात आलेल्या रामबागमध्ये रविवारी (दि. ८) रीदम अॅण्ड रायम या ग्रुपच्या वतीने लाईव्ह म्युझीकल इव्हेंट या सुरेल गाण्यांच्या मैफिलीचे आयोजन रविवारी करण्यात आले होते.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी मस्वर्गसुख आनंद देणारी रामबाग साकारली आहे. १४ एकर जागेतील या रामबाग उद्यानात भव्य आणि सुरेख प्रवेशद्वार, निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या असंख्य विविध रचना, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे, अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक या ठिकाणी आहेत.



सायंकाळी या उद्यानाचे रूप बदलते, त्यावेळी असणारी विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्याचे पारणे फिटणारी आहे. तसेच दिवसेंदिवस नगरीकांच्या गर्दीने रामबाग अधिकाधिक फुलत आहे. त्यापार्श्वभुमीवर रविवारी रीदम अॅण्ड रायम या ग्रुपच्या वतीने संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून याला नागरीकांचा उस्त्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला रामशेठ ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर उपस्थित होते.

## पनवेल कल्चरल असोसिएशनच्या गायन स्पर्धेची रविवारी अंतिम फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल असोसिएशन या संस्थेतर्फे हिंदुस्थानी शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा आयोजित केली जात आहे. यात इच्छुक स्पर्धकांनी ठुमरी अथवा दादरा यापैकी एक आणि बंदिश आणि नाट्यगीत यापैकी एक असे एकूण १५ मिनिटांचे सादरीकरण व्हिडीओ क्लिपिंगच्या माध्यमातून इ-मेलवर पाठविण्याचे आवाहन संस्थेने केले होते. पहिल्या फेरीतून १५ स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली असून ही अंतिम फेरी रविवारी (दि. १५) सकाळी १० ते दुपारी १ आणि २ ते ५ या दरम्यान पनवेल कल्चरल असोसिएशनच्या सभागृहात होणार आहे.

स्पर्धेनंतर निकाल जाहीर करून पारितोषिक वितरणही होईल. विशेष म्हणजे या अंतिम फेरीत श्रोते हेही परीक्षकाच्या भूमिकेत असणार आहेत. जे श्रोते सर्व स्पर्धकांचे गायन ऐकतील ते त्यांना आवडलेल्या स्पर्धकाची 'श्रोते हेही परीक्षक' योजनेतील दोन हजार रुपयांच्या खास पारितोषिकासाठी निवड करु शकतील. त्यामुळे रसिकांनी या स्पर्धा कम संगीत संमेलनास उपस्थित राहून श्रवणानंद तर घ्यावाच पण युवा कलाकारांनाही प्रोत्साहित करावे, असे आवाहन स्पर्धा समिती प्रमुख नंदकुमार कर्वे यांनी केले आहे.

## आस्था मोकाशी शिष्यवृत्तीत उरण तालुक्यामध्ये पहिली

**उरण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परिषद पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी जुलै-२०२२ या परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर केली. त्यानुसार जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात आस्था प्रताप मोकाशी हिने उज्वल यश प्राप्त केले आहे.



६९.८० टक्के मिळवून तिने उरण तालुक्यात पहिली तर संपूर्ण जिल्ह्यात नववी येण्याचा मान मिळवला आहे. तिचे, शाळेचे तसेच तिला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक आणि तिच्या पालकांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन केले आहे. यासोबतच संस्थेच्या अन्य पदाधिकाऱ्यांनीही आस्थाचे कौतुक केले आहे.

## संपादकीय


# भूस्खलनाचे संकट

भारतातील काही भाग भूकंपप्रवण वा भूस्खलनप्रवण क्षेत्र म्हणून ज्ञात आहेच. यात हिमालयातील रांगांचाही समावेश होतो. बद्रिनाथचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या जोशीमठला आता भूस्खलन क्षेत्र असे घोषित करण्यात आले आहे. तेथील भौगोलिक घडामोडींकडे सगळ्यांनीच लक्ष देण्याची गरज आहे, असे तज्ज्ञ सांगतात.

**‘पुढच्यास ठेच, मागचा शहाणा’ अशा आशयाची म्हण मराठी भाषेत आहे. या म्हणीची आठवण यावी अशी काहिशी परिस्थिती सध्या उत्तराखंडमधील जोशीमठ भागात आहे. जोशीमठ हे चारधाम यात्रेतील प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या बद्रीनाथचे प्रवेशद्वार मानले जाते. या शहराची लोकसंख्या अवघी १६ हजार असली तरी तीर्थक्षेत्रभेटीकरिता आणि ट्रेकिंगसाठी वर्षभर प्रचंड संख्येने पर्यटक जोशीमठला येतात. गेल्या गुरूवारी येथील स्थानिकांनी बंद पाळल्यामुळे तेथील भूस्खलनाच्या घटनांकडे अवघ्या देशभराचे लक्ष वेधले गेले. गेल्या वर्षभराहून अधिक काळ येथे जमीन खचण्याचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी केल्या जात होत्या असे आता सांगितले जात असले तरी २०२१च्या नोव्हेंबरमध्ये जमीन भुसभुशीत होऊन धोकादायक ठरलेल्या घरांची संख्या अवघी १४ होती. आता मात्र ही संख्या सहाशेच्या वर पोहोचली आहे. घरांना, दुकानांना, रस्त्यांना भेगा पडल्याची दृश्ये समोर येताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: तेथील परिस्थितीत लक्ष घातले असून सर्व संबंधितांना तातडीची व दीर्घकालीन उपाययोजना आखण्याचे आदेश दिले आहेत. तात्काळ तेथील ६०हून अधिक कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले असून गरज भासल्यास बचावकार्य राबवण्यासाठी हेलिकॉप्टर्सही तैनात ठेवण्यात आली आहेत. सुरक्षित स्थळी हलवलेल्या नागरिकांना जीवनावश्यक सामग्री घेण्याकरिता आर्थिक मदतही पुरवण्यात आली आहे. बचावकार्यासाठी सरकारने ११ कोटी रुपयांचा तातडीचा निधी दिला आहे. तेथील तपोवन–विष्णुगड जलविद्युत प्रकल्पाकरिता जोशीमठाच्या खालील भागातच बोगदा तयार होत असल्यामुळे जोशीमठातील जमीन खचू लागल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे, परंतु वास्तवत: जोशीमठातील जमिन गेली अनेक वर्षे प्रतिवर्षी १ सेंटीमीटरने खचते आहे असेही काही अहवाल सांगतात. काही अहवालांनुसार १९७६पासून या भागातून जमिन खचण्याच्या तक्रारी नोंदल्या गेल्या आहेत. केंद्र सरकारने आता तातडीने सात वेगवेगळ्या यंत्रणांना येथील परिस्थितीचा आढावा घेण्याच्या कामी लावले आहे. जोशीमठला आता भूस्खलनप्रवण भाग असे जाहीर करण्यात आले असून संपूर्ण जोशीमठ शहराची सुरक्षित, असुरक्षित व या दोन्ही भागांमधील ‘बफर’ क्षेत्र अशा तीन भागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. किती काळासाठी दुसरीकडे जायचे आहे याबाबत काहीच कल्पना नसल्याने लोकांमध्ये काहिसे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जोशीमठ परिसरात अलीकडच्या काळात वाढलेली बांधकामे आणि प्रकल्प हे या आपत्तीला जबाबदार असल्याचा संताप स्थानिक व्यक्त करीत आहेत, परंतु वास्तवत: पर्यटनस्थळ असल्याने तेथे अनेक प्रकारची बांधकामे अलिकडच्या काळात उभी राहिली. तेथील गरजा लक्षात घेऊनच वाढीव वीजपुरवठ्यासाठी तेथे वीजप्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. पर्यटनाच्या दृष्टीनेच मोठे रस्ते बांधण्याचे काम सुरू होते. वास्तवत: या पर्यटनावरच येथील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. त्यामुळे या विकासाचा त्यांच्या जगण्याशी संबंध नव्हता असे म्हणणे चुकीचे ठरेल. अर्थात, तरी प्रत्येक ठिकाणची स्थानिक भौगोलिक परिस्थिती, भौगोलिक इतिहास बारकाईने अभ्यासूनच प्रकल्पांची अंमलबजावणी केली जायला हवी ही बाब सगळ्यांनीच ध्यानात घ्यायला हवी आहे.**

# महाड नळ पाणीपुरवठा योजनांचे पाणी झाले खारे!

महाड तालुक्यातील सावित्री नदीकिनाऱ्यालगतच्या गावांना आता वेगळीच समस्या भेडसावू लागली आहे. नद्या या जिवनदायनी समजल्या जातात, मात्र सावित्री नदी याला अपवाद ठरत आहे. सावित्रीचा विध्वंसक पूर आणि ती समुद्राच्या भरतीचे घेऊन येणारे पाणी यामुळे नागरी जीवन उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. कोकणातील कोणतीच नदी किंवा खाडी समुद्राचे भरतीचे पाणी ६० किमी आतपर्यंत घेऊन येत नाही, मात्र अपवाद फक्त सावित्री वगळता...



**खबरबात**
**महेश शिंदे**



सावित्री ही महाड शहरापर्यंत नदी आहे, मात्र येथून पुढे तिचे खाडीत रुपांतर होते. खाडी या निकशांमुळे समुद्रकिनाऱ्याचे कायदे या पात्रालगत लागू होतात. त्यामुळे गाळ काढणे, वाळू उपसा करणे, बांधकामे, जलवाहतूक तसेच पाणी योजनांसाठी मेरीटाईम बोर्डाचे कडक कायदे आडवे येतात. आता तर या भरतीच्या अर्थात उधानाच्या पाणी हे लगतच्या पाणी योजनांच्या विहिरींमध्ये शिरून पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत्र बाधीत होत आहेत. वहूर आणि दासगावमध्ये नळाद्वारे होणारा पाणीपुरवठा पाणी खारे झाले आहे. सध्या खारे झालेल्या पाण्यामुळे या दोन गावातील नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. या पाण्यामुळे दासगाव प्राथमिक आरोग्य केंद्र आणि दासगावमधील गणेशनगर अडचणीत आले आहेत. वहूर आणि दासगाव या दोन गावांसाठी एक स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना आहे. ही योजना प्रभाकर मोरे मंत्री असताना त्यांनी अमलात आणली. या योजनेसाठी रायगड किल्ल्याच्या जवळच असलेल्या कोतुर्डे गावाजवळ बांधण्यात आलेल्या धरणातून पाणीपुरवठा केला जातो, मात्र या दोन गावांसाठी पाणीपुरवठा करणारी जॅकवेल ही मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गालागत असलेल्या मोहप्रे या गावाजवळ असून ही गांधारी नदीच्या काठावर बांधलेली आहे.

धरणातून सोडण्यात येणारे पाणी सात किमी अंतर पार करून या ठिकाणी आणून या दोन गावांना पाणीपुरवठा केला जातो. या जॅकवेळच्या ठिकाणी पाणीसाठा करण्यासाठी एक छोटा बंधारा आहे, मात्र ही जॅकवेल गांधारी नदीवरच बांधण्यात आल्याने दरवेळी सावित्री खाडीमधील भरतीचे पाणी या ठिकाणी येत असते व त्यामुळे दरवेळी वहूर–दासगाव नळ पाणीपुरवठा योजना पाणी दूषित होऊन खारे होतत असते. केव्हा महाड औद्योगिक वसाहतीतमधील कारखान्यांच्या केमिकलचा त्रास तर कधी खाऱ्या पाण्याचा त्रास. यंदादेखील हीच परिस्थिती उद्‌भवली असून या जॅकवेलच्या ठिकाणी सावित्री खाडीतील भरतीचे पाणी शिरल्याने पुरवठा होणारे पाणी संपूर्ण खारे झाले आहे.


दासगाव आणि वहूर गावामध्ये येणारे पाणी खारे येत असल्याने नागरिकांनी पाणी वापरणे बंद केले आहे. गणेशनगर आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात पिण्याचे पाणी नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. जरी पाणी खरे झाले असले, तरी पुरवठा अद्याप सुरूच आहे, मात्र या दोन गावातील नागरिकांनी हे पाणी वापरायचे बंद केले आहे. दासगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात तीन कुटुंब आणि दर दिवस ७० ते ८० रुग्ण उपचार घेत आहेत. या ठिकाणी या नळपाणी पुरवठ्याशिवाय इतर पाण्याचा कोणताच पर्याय नाही. त्यामुळे या ठिकाणी पाण्याचे मोठे हाल झाले आहेत, तर याच शेजारी असलेले गणेशनगर इथे जवळपास १०० घरांचे वास्तव्य आहे. या ठिकाणचीदेखील हिच अवस्था आहे. या गावांची एक विहीर महामार्गाच्या कामात बाधित झाली आहे. त्यानंतर हे सर्व कुटुंब नळ पाणीपुरवठा योजनेवरच अवलंबून आहेत.

स्वदेश फाउंडेशनने यांना लाखो लिटरची टाकी बांधून दिली आहे. त्या टाकीतदेखील याच योजनेचे पाणी सोडून ही टाकी भरण्यात येते, मात्र खाऱ्या पाण्यामुळे टाकीमध्ये येणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. काही दिवसांतच ही टाकी रिकामी होणार आहे. त्यानंतर या ठिकाणी पाणीटंचाईची मोठी भयाण परिस्थिती निर्माण होणार आहे.

पाणी योजना सुरू झाल्यापासून आजपर्यंत कायम कोणती ना कोणती समस्या निर्माण होत आहे. दासगाव–वहूर नळ पाणीपुरवठा योजना सुरू झाल्याला जवळपास २६ वर्षे उलटून गेली आहेत. आज जरी ही समस्या खाऱ्या पाण्याची असली तरी गेली २६ वर्ष या समस्या कायम आहे. महाड औद्योगिक क्षेत्रातील घातक रासायनिक सांडपाणी पाईपलाईनद्वारे थेट सावित्री खाडीत सोडण्यात येते. भरतीच्या पाण्यासोबत अनेक वेळा गांधारी नदीत शिरुन हे केमिकलचे पाणी या जॅकवेलपर्यंत आलेले आहे आणि अनेक वेळा ही नळ पाणीपुरवठा योजना दूषित झालेली आहे, मात्र अद्याप यावर कोणताच ठोस उपाय शोधलेला दिसून येत नाही. तात्पुरता मातीचा बंधारा बांधण्यात आला तरी तो काही दिवसांतच धुपून आतो व पुढे समस्या कायम तशीच राहते. यावर तज्ज्ञांनी तोडगा काढावा, यावर दोन्ही ग्रामपंचायतीने विचार करणे गरजेचे आहे. आजही हे पाणी थांबवण्यासाठी मातीचा तात्पुरता बंधारा तयार करण्याचे काम सुरू आहे. काही दिवसांतच ही समस्या दूर होईल, मात्र ती कायम स्वरुपाची दूर होणार नाही.

पिण्याच्या पाण्यासाठी येथी ग्रामस्थांना चार किमीची पायपीट करावी लागत आहे. ज्यांच्याकडे वाहने आहेत ते वाहनांनी पिण्याचे व वापराचे पाणी नेत आहेत, मात्र ज्यांच्याकडे वाहने नाहीत त्यांना एकतर विकत किंवा पायी हे पाणी मिळवावे लागत आहे. याकडे प्रशासनाने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

## बदलते तंत्रज्ञान



# गुगलला टक्कर देण्यासाठी मायक्रोसॉफ्टचा प्लॅन

गुगल हे सर्वांत मोठे सर्च इंजिन आहे. कोणत्याही गोष्टीची माहिती हवी असल्यास आपण प्रथम गुगलवर सर्च करतो, मात्र चॅटजीपीटी आल्यापासून गुगलच्या मक्तेदारीला टक्कर देणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. ओपनएआयचे चॅटबोट चॅटजीपीटीच्या माध्यमातून अनेक कामे सहज करणे शक्य होते. त्यामुळे याला चॅटजीपीटी गुगलचा प्रतिस्पर्धी ठरण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे मायक्रोसॉफ्ट चॅटजीपीटीच्या माध्यमातून गुगलला टक्कर देणार आहे. रिपोर्टनुसार, मायक्रोसॉफ्ट आर्टिफिशियल इंटेलिजेंस चॅटजीटीपीचा आपल्या प्लॅटफॉर्मवर वापर करू शकते.


**बिंग व्हर्जन लाँच करणार** : रिपोर्टनुसार ओपन एआयच्या चॅटजीपीटीचा वापर करून मायक्रोसॉफ्ट सर्च इंजिन बिंगचे नवीन व्हर्जन लाँच करणार आहे. कंपनीने अधिकृतपणे याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही, मात्र मायक्रोसॉफ्ट या नवीन फीचरला मार्चअखेर लाँच करू शकते.

मायक्रोसॉफ्टने बिंगवर चॅटजीपीटीचा वापर केल्यास यामुळे थेट गुगलला टक्कर मिळू शकते. गेल्यावर्षी मायक्रोसॉफ्टने आपल्या ब्लॉग पोस्टमध्ये माहिती दिली होती की, कंपनीची योजना इमेज–जनरेशन सॉफ्टवेअरला बिंगमध्ये ॲड करणे आहे. इमेज क्रिएशन सॉफ्टवेअरसाठी डॉल–ई २ची मदत घेतली जाईल. आता कंपनी चॅटजीपीटीला सर्च इंजिनमध्ये जोडण्याचा विचार करीत आहे, परंतु ओपन एआय आणि मायक्रोसॉफ्टकडून याबाबत कोणतीही देण्यात आलेली नाही. मायक्रोसॉफ्ट वर्ष २०१९पासून आर्टिफिशियल इंटेलिजेंस कंपनी ओपन एआयला सपोर्ट करीत आहे. कंपनीने एक बिलियन डॉलर फंडिंगदेखील दिले आहे. ओपन एआयने चॅटजीपीटी चॅटबोटला तयार केले आहे. यूजर्ससाठी याचे टेस्टिंगदेखील सुरू केले आहे.

दरम्यान, चॅटजीपीटी चर्चेत आल्यापासून अनेकांनी यामुळे लोकांना नोकरी गमवावी लागू शकते, अशी शक्यतादेखील वर्तवली आहे.

# इतिहास संशोधक गणेश हरी खरे

गणेश हरी खरे हे महाराष्ट्रातील इतिहास संशोधक होते. पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळ येथे ते क्यूरेटर, चिटणीस व नंतर अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. दक्षिणेचा मध्ययुगीन इतिहास, शिवकालीन महाराष्ट्र, महाराष्ट्रातील दैवते, मूर्तिविज्ञान इ. विषयांवर त्यांनी संशोधनपर स्वरूपाचे विपुल लेखन केले आहे, तसेच मराठी, फारसी इत्यादी भाषांतील ऐतिहासिक काळातील कागदपत्रांची संपादनेही केली आहेत. संशोधकाचा मित्र, मूर्तिविज्ञान, महाराष्ट्राची चार दैवते इ. त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत.



ग. ह. खरे यांचा जन्म पनवेल येथे १० जानेवारी १९०१मध्ये झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण द्रविड हायस्कूल, वाई येथे झाले. १९२०साली मॅट्रिक झाल्यावर त्यांनी सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयात प्रवेश घेतला. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना पहिल्याच वर्षी महात्मा गांधी यांच्या असहकारितेच्या चळवळीत सहभागी होऊन त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण सोडले. कोयना धरणामुळे विस्थापित होणाऱ्यांचे पुनर्वसन व्हावे आणि त्यांना योग्य ती भरपाई मिळावी यासाठी खरे यांनी प्रचाराची मोहीम राबवली. परिणामी त्यांचे सहकारी वि. ना. आपटे यांच्यासह खरे यांच्यावर अशांतता माजवत असल्याचा आरोप ठेवण्यात आला आणि असहकारितेच्या तत्त्वाप्रमाणे जामीन द्यायचे नाकारल्याने त्यांना १२ ऑगस्ट १९२२पासून एक वर्ष बंदिवासाची शिक्षा देण्यात आली.

**निमित्त**

बंदिवासातून सुटका झाल्यावर खरे यांनी १९२४च्या उत्तरार्धापासून १९२९ च्या प्रारंभापर्यंत साताऱ्याच्या राष्ट्रीय शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी नोकरी केली. या काळात त्यांनी इतिहाससंशोधनासाठी आवश्यक पूर्वतयारी केली. शिलालेखांचे ठसे घेण्याचे काम ते स्वतःच अभ्यास करून शिकले, तसेच त्यांनी ब्राह्मी आणि उर्दू या लिपींचेही अध्ययन करून त्या आत्मसात केल्या. त्या लिपींतील साहित्य त्यांना वाचता येऊ लागले.

साताऱ्याच्या राष्ट्रीय शाळेतील नोकरी सोडल्यावर खरे पुणे येथे आले. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शिवचरित्र–कार्यालयात मोडी कागदपत्रांच्या लिप्यंतराचे काम त्यांनी काही काळ केले. सहा महिन्यांनतर त्यांची नेमणूक शिवचरित्र–कार्यालयात करण्यात आली. १९३०साली त्यांची नेमणूक भारत–इतिहास–संशोधक मंडळात करण्यात आली. मंडळात काम करीत असताना खरे यांनी स्वतःच पुस्तकांच्या व फारसी जाणकारांच्या साहाय्याने फार्सी भाषा व लिपी आत्मसात केली, तसेच कानडी भाषा व लिपी ह्यांचाही अभ्यास केला. जुनी कानडी भाषाही (हळे कन्नड) त्यांना कळू लागली.

खरे यांनी शिवचरित्रसाहित्य खंड ६ (१९३७), खंड ११ (१९५८), खंड १२ (१९६४), खंड १३ (१९६५) यांचे संपादन केले, तसेच त्यांनी ऐतिहासिक फारसी साहित्याचे सहा खंड संपादित केले. त्यांचे इतिहास संशोधनपर लेखन विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाले. त्यांनी विविध ठिकाणी भ्रमंती करून कागदपत्रे व इतर ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह करून तो भारत–इतिहास–संशोधक मंडळाला मिळवून दिला. यात सुमारे २०,००० पोथ्या, ५००० नाणी, १५० चित्रे आणि ३० ताम्रपट व शिलालेखांचा समावेश आहे. त्यांनी ५०हून अधिक पुस्तके आणि इंग्लश व मराठी या भाषांत मिळून सुमारे ३५० लेख लिहिले आहेत. पुरातत्त्वापासून भारताच्या स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासापर्यंत त्यांच्या ज्ञानाची व संशोधनाची व्याप्ती होती.

शेवटपर्यंत अविवाहित राहिलेल्या खरे यांना आयुष्यात अनेक मानसन्मान मिळाले. इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डर्स कमिशनवर १९४२पासून मंडळाचे प्रतिनिधी म्हणून आणि १९७२पासून सरकारने नेमलेले प्रतिनिधी म्हणून ते जात असत. ते स्वत: पदवीधर नसूनही पुढे विद्यापीठाने इतिहासातील डॉक्टरेटकरिता मार्गदर्शक व परीक्षक म्हणून त्यांची नेमणूक केलेली होती. १९७४मध्ये ते न्युमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. डिसेंबर १९७९मधील इंडियन हिस्टरी कॉँग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. १९८४मध्ये पुणे विद्यापीठाने त्यांना डी. लिट देऊन गौरविले.

**–साभार विकीपिडीया, महाराष्ट्र नायक**

**क्लिक...क्लिक...!**




**देवगड : तळ कोकणात गावोगावी असणाऱ्या मंदिरांमुळे गावातील वातावरण अतिशय शांत व धार्मिक आहे. सायंकाळच्या वेळी शांत झालेल्या नदीच्या किनारी वसलेले हे मंदिर पाहूनच मनालाही एक वेगळी शांतता लाभते. अशा शांत मंदिरात बसून भगवंताचे स्मरण केल्याने एक आत्मिक समाधानही मिळते.**

## आरोग्य प्रहर

# विसरभोळेपणा दूर करण्यासाठी करा ‘हे’ उपाय

आपल्यापैकी अनेकजण लहान सहान गोष्टी विसरुन जातात. विसरभोळेपणा हा प्रत्येकामध्ये थोड्याफार प्रमाणात असतो. शिवाय विसरण्याच्या सवयीमुळे आपणाला



कामाच्या ठिकाणी, घरात किंवा बाहेर फिरायला गेल्यावर अनेक अडचणींचा सामाना करावा लागतो. यामध्ये वस्तू विसरणे, एखादे काम विसरणे किंवा एखादी महत्त्वाची गोष्ट कोणाला सांगायला विसरणे असे अनेक प्रकार आपल्याबाबत घडत असतात.

दिवसातून एखादे काम विसरणे ही काही मोठी गोष्ट नाही, ते कोणाच्याही बाबतीत होऊ शकते, परंतु तुमच्याकडून वारंवार अनेक गोष्टी विसरत असतील, तर मात्र तुम्ही एखाद्या डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकता. फोन विसरणे, एखाद्याने सांगितलेले काम विसरणे यांसारख्या काही गोष्टी सतत विसरण्याची सवय तुम्हाला लागली असेल तर याचा अर्थ तुमची स्मरणशक्ती कमकुवत झाली असण्याची शक्यता आहे. जर तुमची स्मरणशक्ती कमकुवत झाली असेल तर तुम्हाला घाबरण्याचं कारण नाही. कारण, आज आम्ही तुम्हाला काही घरगुती उपाय सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही तुमची स्मरणशक्ती मजबूत करू शकणार आहात.

**ब्रेन फूड्स खा** : ज्याप्रमाणे आपल्या शरीराला पोषणाची गरज असते, त्याचप्रमाणे मेंदूलाही निरोगी राहण्यासाठी आणि योग्यरित्या कार्यरत राहण्यासाठी पोषणाची आवश्यकता असते. असे काही नैसर्गिक पदार्थ आहेत जे मेंदूसाठी आवश्यक असतात, त्या पदार्थांचा तुमच्या रोजच्या आहारात समावेश करायला हवा. ज्यामध्ये, पाण्यात भिजवलेले बदाम, मनुका, तूप, ऑलिव्ह ऑईल, अक्रोड, खजूर यासह ताज्या फळांचा वापर आहारात केल्याने स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते, तसेच मसूर, बीन्स, पनीर या पदार्थांतही मेंदूसाठी चांगले असतात.

**औषधी वनस्पती** : आयुर्वेदिक औषधी वनस्पती मानवी मेंदूच्या धी, धृती आणि स्मृती या तीन्ही शिकण्याच्या क्षमतांमध्ये सुधारणा करत असतात. गोटू कोला, अश्वगंधा आणि बाकोपा यांसारख्या यातील काही विशेष औषधी गुणतत्व स्मरणशक्ती वाढवण्याचे काम करतात.

**भाज्या आणि फळांचे प्रमाण वाढवा** : एका सर्वेक्षणानुसार, आपला आहार आणि आपली स्मरणशक्ती यांचा एकमेकांशी संबंध असतो. त्यामुळे जास्त प्रमाणात भाज्या आणि फळांचा समावेश आहारात केल्यास विसरभोळेपणा कमी होण्यास मदत होते.

**(टीप : वरील लेख हा प्राप्त माहितीवर आधारित आहे, गरज असल्यास वैद्यकीय सल्ला घ्यावा.)**

# वणव्यामुळे डोंगरांची शोभा हरवतेय

## रोखण्याचे सर्वांसमोर आव्हान; वन्यप्राणी, पक्ष्यांना झळ

**माणगांव : प्रतिनिधी**

लांबलेल्या पावसाने हिरवेगार दिसणारे डोंगर उन्हाळा वाढू लागल्या नंतर अचानक काळे दिसू लागले आहेत. उन्हाची तीव्रता वाढू लागल्यानंतर माळरानावर पसरलेले गवत सुकू लागले आहे. या सुकणाऱ्या गवताना अचानक वणवे लागत असून मानवनिर्मित या वणव्यांमुळे डोंगरांचा रंग काळा दिसत आहे. एरवी हिरवेगार दिसणारे डोंगर उन्हाळा सुरू होताच वणव्यामुळे काळे दिसू लागल्याने डोंगरांची शोभा हरवत चालली आहे.



काही महिन्यांपासून उन्हाचा पारा वाढत आहे. तीव्रता वाढत असतानाच डोंगरांना अचानक आग लागून वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. वृक्षराजींनी समृद्ध असलेल्या या डोंगररांगा वणव्यामुळे ओसाड, उजाड होत आहेत. या वणव्यात मोठया वृक्षांच्या बरोबरीने लहान रोपांचीही हानी होत आहे. आंबे, काजू यासारखी फळझाडे करपून जात आहेत. यामुळे फळपीकमोहोर होरपळून जात असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

वन्य प्राण्यांनाही या वनव्याच्या मोठया प्रमाणात झळा बसत असून त्यांचे अधिवास नष्ट होत आहेत. वेळीच वणवे रोखली नाहीत तर जैवविविधता धोक्यात येईल.

**वनव्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे डोंगर काळे दिसू लागले आहेत. निसर्ग सौंदर्य बिघडत चालले असून, पर्यावरणाची हानी होतेये. त्यामुळे जनजागृती करून वणवे लावण्याचे प्रमाण कमी केले पाहिजे.**
**–राम मुंढे, पर्यावरणप्रेमी, अभ्यासक**

**गेल्या काही दिवसांपासून वणवे लागत असल्याने आंबा, काजू पिकांचे नुकसान होत आहे. नुकताच मोहोर येऊ लागला आहे. हा मोहोर करपून जाण्याची श्यक्यता आहे. वनसंपत्ती बरोबर, पशुपक्ष्यांना या वणव्याचा त्रास होत आहे. वेळीच हे वणवे रोखले पाहिजे.**
**–प्रदीप लांगी, निसर्गप्रेमी**

# रेवदंडा समुद्र किनारा स्वच्छता अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्र किनारा स्वच्छता अभियान अंतर्गत रेवदंडा समुद्र किनारपट्टी साफसफाईसह व स्वच्छतेचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.चौल निसर्ग ग्रुप, नेहरू युवा केंद्र–रायगड व ओएसिस बहुउद्देशीय समाजभिमुख संस्था यांच्या सयुक्त विदयमाने आयोजीत समुद्र किनारा स्वच्छता अभियानास रविवारी सकाळी प्रारंभ झाला.

यावेळी निसर्गप्रेमी संस्थेच्यावतीने राकेश काठे, स्वरा काठे, गुरू घरत, प्रविण कवळे, स्वराज नाईक, मितेश वैदय,संदेश बेडेकर, साई झावरे, शैलेश राईलकर, प्रतिक कोळी, तसेच ओएसीस ग्रुप यांचेसह ३० जणांनी या समुद्र किनारा स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. या स्वच्छता अभियानात समुद्र किनारावरील केर, कचरा, प्लॅष्टिक बाटल्या, आदी साफसफाईचा स्तुत्य उपक्रम श्रमदानाने राबविण्यात आला. रेवदंडा पारनाका नजीकच्या समुद्र किनारपट्टीवर श्रमदानाने स्वच्छतेतून जमा झालेल्या कचरा गोणीव्दारे टेम्पोमध्ये भरण्यात आला.

या स्वच्छता अभियानास जेएसडब्लू कंपनीच्या सिएसआर विभागाचा बहुमूल्य सहकार्य लाभले. साळाव जेएसडब्लू कंपनीच्या सिएसआर विभागाच्या अधिकारी प्रिती म्हात्रे यांनी सुध्दा या उपक्रमात सहभाग घेतला.

# अलिबागमधील चौघे राज्यस्तरीय कुलाबा जीवन पुरस्काराने सन्मानित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

क्रीडाक्षेत्रात विशेष प्राविण्य प्राप्त अलिबागच्या चार युवकांचा राज्यस्तरीय कुलाबा जीवन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अलिबाग येथे भाई जगताप मित्रमंडळ, मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट व ए.पी.जे. अब्दुल कलाम मित्रमंडळ यांच्या संयुक्त विदयमाने अलिबागचे प्रियंका संदेश गुंजाळ, शुभम महेंद्र नखाते, वेदांत संदेश सुर्वे, माहि राजेंद्र खमीस यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरीबद्दल ॲड. उमेशदादा ठाकूर यांच्या वाढदिवसांचे औचित साधून हा सन्मान कर्तृत्वाचा गौरव महाराष्ट्राचा या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय कुलाबा जिवन गौरव पुरस्कार २०२३ ने सन्मानित करण्यात आले.

अलिबागचे प्रियंका संदेश गुंजाळ, शुभम महेंद्र नखाते, वेदांत संदेश सुर्वे, माहि राजेंद्र खमीस यांनी सिकाई मार्शल आर्ट, लाठी, तांग सु डो, कराटे आदी क्रीडा प्रकारात अलिबागचे नाव राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय



पातळीवर उंचावले आहे.

यामधील शुभम महेंद्र नखाते यांना लाठी खेळामध्ये मे २०२२ मध्ये दक्षिण आशियाई स्पर्धेत भारतासाठी निवड होऊन दोन सुवर्ण पदक प्राप्त, २०२२ मध्ये सोलापुर मध्ये राष्ट्रीय स्पर्धेत १ सुवर्ण पदक, जानेवारी २०२३ मध्ये होणार्या राष्ट्रीय मार्शल आर्ट खेळासाठी लाठी स्पर्धेत महाराष्ट्रासाठी तसेच राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. तसेच लाठी खेळात राज्यस्तरीय व राष्ट्रीय पंच ही पदवी त्यांनी प्राप्त केली आहे. तसेच सिकाई मार्शल आर्टमध्ये सहा राष्ट्रीय खेळात महाराष्ट्राचे नेतृत्व केले आहे. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये सहभागी होऊन यश मिळविले आहे. तसेच प्रियंका सुदेश गुजांळ, वेदांत संदेश सुर्वे, माहि राजेंद्र खमिस यांनी सुध्दा सिकाई मार्शल आर्ट, लाठी काठी, कराटे आदी स्पर्धेत राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन कास्य, रौप्य व सुवर्ण पदक प्राप्त केले आहे.

सन्मान कर्तृत्वाचा गौरव महाराष्ट्राचा या कार्यक्रमा अंतर्गत अलिबाग येथे भाई जगताप मित्रमंडळ, मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट व ए.पी.जे. अब्दुल कलाम मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागचे प्रियंका संदेश गुंजाळ, शुभम महेंद्र नखाते, वेदांत संदेश सुर्वे, माहि राजेंद्र खमीस यांना राज्यस्तरीय कुलाबा गौरव पुरस्काराने ॲड. उमेशदादा ठाकूर व अन्य मान्यवरांचे हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगूच्छ तसेच मानचिन्ह, प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

# माथेरानमधील ई-रिक्षांवर 'टाटा'ची नजर

## कन्सल्टन्सिंग सर्व्हिसेस करणार अभ्यास

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान हिल स्टेशन म्युनिसिपल कौन्सिलने चाचणी अंतर्गत ई–रिक्षा सेवेवर सामाजिक – पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबईची नियुक्ती केली आहे. ४० दिवसांच्या अभ्यासात हातगाड्या, पुशकार्ट आणि घोडेधारक/हँडलर यांच्या आर्थिक पैलूंचा अभ्यास केला जाईल. त्यासाठी पालिका सुमारे १० लाख रुपये खर्च करत आहे. टाटा कन्सल्टन्सीग सर्व्हिसेस विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्राध्यापकांच्या नेतृत्वाखाली सर्वे क्षण सुरू केले आहे.

तीन महिन्यांसाठी राज्य सरकार कडून ई–रिक्षा चाचणी पायलट प्रकल्प राबविला जात आहे. ही सेवा पाच डिसेंबर २०२२ रोजी सुरू करण्यात आली. नगरपरिषदेकडून



टीआयएसएसमार्फत १२ डिसेंबर २०२२ रोजी सर्वेक्षण सुरू केले. माथेरानमध्ये चालविण्यात येत असलेल्या या नागरी संस्था त्याच्या परिणामांबद्दल प्रत्यक्ष अहवाल मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. जे त्याचा भाग बनतील. ई – रिक्षा सेवेच्या य शाबद्दल माथेरान इको– संवेदनशीलता – नियंत्रण समिती आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम अहवालानुसार ४५०० लोकसंख्या असलेल्या या शहरात शंभर टक्के पर्यटनावर अवलंबून आहेत. ९४ हातगाड्या आणि पुशकार्ट, ४६० प्रवासी घोडे आणि ५०० पोनी (माल वाहतुकीसाठी वापरले जाणारे घोडे) सेवा देण्यासाठी हिल स्टेशनवर आहेत. सध्या सात ई –रिक्षांची चाचणी घेण्यात येत आहे.

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे म्हणाल्या, ' टीआयएसएसद्वारे तटस्थ सर्वेक्षण सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय दृष्टीकोनांवर अंतिम विश्लेषण अहवाल मिळविण्यात मदत करेल. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ई – रिक्षा चाचणी सेवा सुरू राहील असे जाहीर करण्यात आले आहे. यापूर्वी, स्थानिक अश्वपाल संघटना, घोडे मालक आणि स्वारांच्या संघटनेने ई – रिक्षा सेवेच्या निषेधार्थ उपोषण करण्याची धमकी दिली होती तर त्यांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होत असलेल्या व्यवसायाचे नुकसान, नूतनीकरण केलेल्या रस्त्यावर घोडे घसरणे इत्यादींचा दावा केला होता. शाळा, राजकीय पक्ष आणि व्यापारी, पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि लॉज मालकांसह विविध संघटनांनी, प्रवासाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ई – रिक्षांची संख्या वाढवून ई – रिक्षा सेवेची मागणी केली आहे.

# शैलेश पालकर यांचा लोहारे येथे सत्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण पत्रकारिता पुरस्कार २०२२ स्विकारल्यानंतर साने गुरूजी विद्यालय, लोहारे येथे पोलादपूर येथील ज्येष्ठ ग्रामीण पत्रकार शैलेश पालकर यांचा पोलादपूर तालुक्यातील पहिला सत्कार आयोजित करण्यात आला.

यात्प्रसंगी व्यासपिठावर सहयोग प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रमेश चव्हाण, उदघाटक प्रमुख अतिथी माई तथा मंजुळा गांधी, देणगीदार शुभांगी उतेकर, संस्थेचे कार्यवाह दत्तात्रय काठाळे, विश्वस्त सुखदेव



मोरे, सुरेंद्र जाधव, सुभाष ढाणे, उपसरपंच लिलाजी शेडगे तसेच प्रशालेच्या पूर्व प्राथमिक मुख्याध्यापिका संजना शिंदे, प्राथमिक मुख्याध्यापिका साधना चिकणे, माध्यमिक मुख्याध्यापिका सुगंधा वाढवळ आदी मान्यवर उपस्थित होते. स्नेहसंमेलनाचा शुभारंभ माई गांधी यांच्याहस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. मान्यवरांच्याहस्ते यावेळी दीपप्रज्वलन करण्यात आले.

यात्प्रसंगी काठाळे, माई गांधी, शुभांगी उतेकर तसेच स्नेहसंमेलनाच्या शुभारंभाचे अध्यक्ष रमेश चव्हाण यांची समयोचित भाषणे झाली. सूत्रसंचालन विनय हाटे यांनी केले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत चिंतामणराव केळकर विद्यालयाचे यश

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परिक्षेत चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन प्राप्त केले आहे. शाळेतील २३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. या मध्ये ११ विद्यार्थिनींचा तर १२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मराठी माध्यमातील पाचवीतील ५ विद्यार्थ्यांना तर इंग्रजीमाध्यमातील पाचवीतील ९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तर इयत्ता आठवीतील मराठी माध्यमातील शाळेच्या २ तर इंग्रजी माध्यमातील शाळेच्या ७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. यापुर्वी सन २०१९–२० मध्ये शाळेतील २१ विद्यार्थ्यांना तर २०२०–२१ मधील १३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली होती.


## कागदपत्रे हरविलेबाबत

**श्री. वसंत मारुती पवार,** पत्ता : बी–१/१०४, प्रेस्टीज गार्डन, पाचपखाडी, ठाणे (प.) ४००६०१ यांचेकडून प्रवास करीत असताना खालील **कागदपत्र दिनांक २०/१२/२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता पनवेल परिसरात पडून हरवले आहे.** त्याबाबत पनवेल शहर पोलिस स्टेशनला दिनांक ६/१/२०२३ रोजी नोंद (रजिस्ट्रेशन नंबर ००४२/२०२३) केली आहे.

**हरविलेले कागदपत्र**
वैज्ञानिक निवास सहकारी संस्थेचे लिज डीड
भूखंड क्र. १२ चे मुळ दस्ताऐवज

सदर कागदपत्र जर कुणाला सापडले असल्यास वसंत मारुती पवार यांचेकडे आणून द्यावे किंवा या नंबरवर ९८३३२ ८०७७७ संपर्क साधावा.

दिनांक : ९/०१/२०२३

**सही/–**
**वसंत मारुती पवार**


# श्रीधर जंजीरकर यांचा सत्कार

**मुरुड जंजिरा : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे राहणारे श्रीधर रघुनाथ जंजीरकर यांचा अलिबाग अवास येथे सुरु असलेल्या क्षात्रैक्य कृषक महोत्सवात विशेष सत्कार करण्यात आला.

क्षात्रैक्य कृषक महोत्सवाचे स्वागताध्यक्ष अभिजित राणे, अध्यक्ष द्वारकानाथ नाईक, कार्याध्यक्ष प्रदीप नाईक, सचिव श्रीनाथ कवळे, क्षात्रैक्य समाज अलिबागचे अध्यक्ष अविनाश राऊळ यांच्याहस्ते श्रीधर जंजीरकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जंजीरकर याना शाल,श्रीफळ प्रशस्तिपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

जंजीरकर १८ वर्षांपासून शेती व्यवसाय करीत असून गांडूळ खत प्रकल्प, भाजीपाला लागवड, मल्चिंग पेपर वरील भात शेती, असे विविध उपक्रम



राबवून शेतीमध्ये विविध विक्रमी पीक ते घेत असतात. किसान क्रांती संघटने मार्फत स्थानिक शेतकऱ्यांना शेती विषयक प्रशिक्षण देणे, शेतऱ्यांसाठी आरोग्य शिबिर भरवणे, शेतकऱ्यांना पॉवर ट्रिलर देणे, शेतीला प्रोत्सहन देण्यासाठी शेतकरी जोडप्यांचा सत्कार करणे, असे विविध उपक्रम, संघटनेमार्फत राबवत असतात. या सर्व कार्याची दखल क्षात्रैक्य कृषक महोत्सवात घेण्यात येऊन यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

# ९०३ विद्यार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रमात लता मंगेशकरांच्या आठवणींना उजाळा

## शारदा मंदिरचे स्नेहसंमेलन

**कर्जत : प्रतिनिधी**

अभिनव ज्ञान प्रबोधिनी ट्रस्टच्या शारदा मंदिर इंग्लीश मिडीयम स्कूलचा स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहात व दिमाखात पार पडला. 'स्वरांजली : भारतरत्न लता मंगेशकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली' या विषयावर स्नेहसंमेलन साजरे झाले. ९०३ विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी घेतला होता.

कर्जतमधील रॉयल गार्डनच्या सभागृहात शारदा मंदिर इंग्लिश मिडीयम स्कुलच्या वार्षिक स्नेहसम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून स्नेहसम्मेलनाचे उदघाटन करण्यात आले. यात्प्रसंगी अनिल जोशी, सुचिता शिंदे, रविंद्र खराडे, अनुपमा कुलकर्णी, मोहन पाटील,पद्माकर गांगल, नंदकुमार मणेर, आरती नेमाणे आदी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका छाया नगरकर व स्नेहसंमेलन प्रमुख रशिदा कर्जतवाला यांनी

स्वागत केले. लता मंगेशकरांनी गायलेल्या विविध गाण्यांवर शाळेतील एकूण ९०३ विद्यार्थ्यांनी नृत्ये सादर केली. या नृत्य आविष्काराचे नृत्यदिग्दर्शन शिक्षकांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शबनम मिर्झा, कु. स्मिता कदम, हेमलता दगडे, तन्झिला कादरी, चेतना महांगडे दर्शना राऊत या शिक्षकांनी केले.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती १) श्रीमती. जनाबाई उर्फ सुनीता रघुनाथ पारधी, २) कै. चांगुणाबाई तुकाराम मुकादम मयत तर्फे वारस, i) श्री. सुभाष तुकाराम मुकादम, ii) श्री. भगवान तुकाराम मुकादम, iii) श्री. दतात्रेय तुकाराम मुकादम, iv) श्री. एकनाथ तुकाराम मुकादम, v) श्रीमती. रंजना पांडुरंग पाटील, vi) कै. पांडुरंग तुकाराम मुकादम मयत तर्फे वारस, अ) श्रीमती. सुगंधा पांडुरंग मुकादम, आ) श्री. पवन पांडुरंग मुकादम, इ) श्री. पराग पांडुरंग मुकादम, यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. ज्यांचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिन मिळकतीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकती' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे– वडवली, ता पनवेल व जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २३ | ४/ब | ०.०४.०० **पो.ख.** ०.०४.०० **एकूण ०.०८.००** | ०.०९ |
| २३ | ७/ब | ०.०२.०० **पो.ख.** ०.००.०० **एकूण ०.०२.००** | ०.०८ |

तरी वरील सदरहू मिळकती बाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०१/२०२३

**सही /–**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले**

२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड
पिन कोड – ४००७०२. मोबाईल नं. ७४०००९७२८६


# मुरुडमधील उद्यानाचे रुपडे पालटले : बालगोपाळांची गर्दी वाढली

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड–जंजिरा हे पर्यटन स्थळ असून पर्यटकांना मोहित करणारा लांबलचक समुद्र किनारा भुरळ न घालेल तरच नवल. शतकांचा इतिहास लाभलेल्या या पर्यटन नगरीत ऐतिहासिक जंजिरा व पद्मदुर्ग किल्ला पाहण्यासाठी प्रतिवर्षी लाखो पर्यटक दाखल होत असतात. येणाऱ्या हौशी पर्यटकांसाठी बीचवरील दुर्तफा असलेल्या स्टॉल्सवर खाद्य संस्कृतीचा आस्वाद घेत समुद्रात यथेच्छ डुंबणे, अनवाणी सुमारे २ .५ कि.मी. बीचवर फेरफटका मारणं तसेच वॉटर स्पोर्टस, उंट सफारी, घोडा गाडी, घोडेस्वारी करणे आवडते. तसेच महत्वाचे म्हणजे अलिकडेच सजवलेली विश्रामबाग हे बाल गोपाळांसाठी मोठे आकर्षण ठरु पहात आहे. या बागेतूनच अथांग सिंधू सागरातील समुद्राची गाज, समुद्र लाटा आणि सूर्यास्ताचा अनोखा देखावा न्याहाळणे शक्य होते.

बच्चे कंपनीला विरंगुळा विश्राम बागेत बागडण्याचा आनंद अबाल वृद्ध लुटत आहेत. तसेच शहरातील भोगेश्वर मंदीर उद्यान, सिद्धी बाग उद्यान, संत गोरोबा कुंभार उद्यान, अलका पुरी उद्यान, श्री दत्त गुरु उद्यान यांचे सुशोभीकरण सुरु असून लवकरच यांचा



लोकार्पण सोहळा होणार आहे.

या संदर्भात मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी सांगितले की, मुरुड जंजिरा नगर परिषदेला आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून शासनाकडून सुरुच्या बनासाठी ३ कोटी ५० लाख तर उर्वरित उद्यानांच्या सौंदर्यीकरणासाठी १ कोटीचा निधी उपलब्ध करून दिला आहे .

समुद्र किनारी असलेली विश्राम बाग, एसटी डेपो समोरील श्रीदत्त गुरु उद्यान, अलका पूरी उद्यान पूर्ण झाली असून लोकार्पण केली आहेत. तसेच कुंभार वाड्यातील संत गोरोबा कुंभार उद्यान, नगरपरिषे समोरील सिध्दी बाग व जंजिरकर गल्लीतील भोगेश्वर उद्यानाची कामे प्रगती पथावर आहेत. मात्र समुद्र किनाऱ्यावरील सुरुचे उद्यान प्रस्तावित असले तरी सीआरझेड परवानगीनंतरच सुरु होईल अशी माहिती मुरुड नगरपरिषदेचे प्रशासक तथा पंकज भुसे यांनी यावेळी दिली. उद्यानाचे उद्दात्तीकरण झाल्याने भकास असणारे बगीचे विविध फुलांनी फुलले आहेत. बगिचांमध्ये नवीन बेंच तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी विविध खेळणी मिळाल्यामुळे सायंकाळी या ठिकाणी मोठी गर्दी पहावयास मिळत आहे. मुरुड शहरातील उद्याने आता बालगोपालच्या किलबिलाट ने गजबजून जात आहेत. मोठी गर्दी व त्यामुळे स्थानिक व्यवसायिक याना सुद्धा मोठा व्यवसाय उपलब्ध झाला आहे.

# समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संघटित व्हा!

## माणगावात कुणबी जोडो अभियान; नेत्यांचे समाजबांधवांना आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगडसह कोकणात मोठ्या प्रमाणात कुणबी समाज आहे. तो विखुरला आहे. त्यामुळे समाजाकडे शासन गांभीर्याने पाहत नाही. त्यामुळे समाजाची उपेक्षा कायमआहे. हक्क, कर्तव्य समजावून सांगत त्यांची जनजागृती करणे गरजेचे आहे. एकट्याने लढून मिळणार नाही. त्यासाठी एकत्रित ताकद निर्माण करणे गरजेचे आहे. कुणबी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाज एक संघ राहिला तर आपले प्रश्न सुटतील समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कुणबी समाजाने मतभेत बाजूला ठेवून संघटित झाले पाहिजे, असे आवाहन कुणबी समाजोन्नती संघ रायगड जिल्हा कुणबी जोडो अभियान नियोजन प्रमुख ज्ञानदेव पवार तसेच कुणबी समाजोन्नती संघाच्या विविध मान्यवरांनी कुणबी जोडो अभियानात केले.



(छाया : सलीम शेख)

या वेळी कुणबी समाजोन्नती संघ मुंबई अध्यक्ष भूषण बरे, कुणबी राजकीय संघटन समिती अध्यक्ष अशोक वालम, कार्याध्यक्ष कृष्णा कोबनाक, कुणबी उच्च अधिकार समिती अध्यक्ष शंकरराव म्हसकर, कुणबी जोडो अभियानाचे नियोजन प्रमुख तथा माणगाव नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, महादेव बक्कम, जिल्हा समन्वय समिती अध्यक्ष उदय कठे, सरचिटणीस शिवराम महाबळे, माणगाव तालुकाध्यक्ष सुभाष भोनकर, सखाराम पोटले, सरचिटणीस विजय भोस्तेकर, सरचिटणीस राजेंद्र खाडे, रमेश मोरे, रामभाऊ टेंबे, काका नवगणे, विपुल उभारे, कुणबी सेवा ट्रस्ट संस्थापक निलेश सत्वे उपस्थित होते.

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई, कुणबी राजकीय संघटन समिती यांच्या सहकार्याने ८ ते १५ जानेवारी पर्यंत कुणबी जोडो अभियान महाड, पोलादपूर माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, रोहा, मुरुड, अलिबाग, पेण, सुधागड, पाली, खालापूर, कर्जत, उरण, पनवेल आदी तालुक्यातून राबविण्यात येत आहे. रथ यात्रा ९ जानेवारी रोजी सकाळी माणगाव तालुक्यातील लोणेरे, गोरेगाव, मढेगाव, उणेगाव, लोणशी, ढालघर फाटा, माणगाव शहर, भाले, भिनाड, इंदापूर, खरवलीफाटा, पेण बोरघर, चरई, साई, चांदोरे अशी करण्यात आली. त्यावेळी माणगाव येथील कुणबी समाज सभागृहात सभा घेतली.

या अभियानात समाजाच्या ज्वलंत समस्यांबाबत जनजागृती करुन केंद्र आणि राज्य सरकारकडून त्यांची सोडवणूक करून घेणे. कुणबी, ओबीसींची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे. लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळालेच पाहिजे, मुंबईसह कोकणातील कष्टकरी कुणबी, ओबीसी यांना त्यांच्या राहत्या घराखालील जमिन तसेच शेतीसाठी कसत असलेल्या शेतजमिनींची माहिती, हक्क, सातबाराच्या उताऱ्यावर कब्जेदार सदरी नोंद करण्यात यावी. या आणि इतर समस्यांबाबत कोकणातील कुणबी समाजामध्ये जनजागृती या अभियानातून करण्यात आली.

# शहीद वीर यशवंतराव घाडगे यांचे महायुद्धातील शौर्य अभिमानास्पद

## माणगाव येथील जयंती समारंभात प्रांताधिकारी उमेश बिरारी यांचे गौरवोद्गार

**माणगाव : प्रतिनिधी**

व्हिक्टोरिया क्रॉस ही इंग्लंडची राणी आहे. त्यांच्या नावाने देशातील चार लोकांना व्हिक्टोरिया क्रॉस हे मानचिन्ह देण्यात आले होते. त्यापैकी एक म्हणजे माणगाव तालुक्यातील शाहिदवीर यशवंतराव घाडगे यांना ते मानचिन्ह देण्यात आले असून हे तमाम माणगाववासियांना अभिमानास्पद आहे. शहीद वीर घाडगे यांनी दुसऱ्या महायुद्धात अतुलनीय असे शौर्य गाजविले, असे गौरवोद्गार माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) उमेश बिरारी यांनी माणगाव येथे वीर घाडगे यांच्या जयंती कार्यक्रमात बोलताना काढले.

शहीद वीर यशवंतराव घाडगे, व्हिक्टोरिया क्रॉस मानचिन्हधारक (मरणोत्तर) यांची जयंती समारंभ सोमवार (दि. ९) उपविभागीय अधिकारी, माणगाव उपविभाग माणगाव यांच्या कार्यालयासमोरील प्रांगणात सकाळी साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रांताधिकारी उमेश बिरारी यांनी भूषविले.या समारंभाला घाडगे उत्सव समितीच्या सचिव माणगाव तहसीलदार प्रियांका आयरे, कर्नल प्रकाश चव्हाण, सुभेदार मेजर चंद्रकांत निगडे, सुभेदार मेजर श्री.शेख, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय वैशाली पाटील, वीर घाडगे यांचे नातू सुभाष घाडगे, माजी सैनिक संघटना माणगाव अध्यक्ष विष्णू सावंत, नरसिंगराव कदम, सामाजिक कार्यकर्ते संजयआण्णा साबळे, घाडगे कुटुंबीय,आदी मान्यवरांसह नागरिक,महसूल खात्याचे कर्मचारी, नगरसेवक, नगरसेविका, नागरिक, पोलीस अधिकारी कर्मचारी, पत्रकार, विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला दरवर्षी वीरपत्नी लक्ष्मीबाई घाडगे येत असत. परंतु वयाच्या ९९ व्या वर्षी गेल्या वर्षी वीरपत्नी लक्ष्मीबाई घाडगे यांचे निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांनी शेवटपर्यंत लक्ष्मीबाई यांची सेवा केली. यावेळी कर्नल प्रकाश चव्हाण, सुभेदार मेजर चंद्रकांत निगडे, श्री.शेख,हेगडे मॅडम यांनीही शाहिदवीर यशवंतराव घाडगे यांच्या पराक्रमाचे कौतुक करीत त्यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

सुरुवातीला ध्वजारोहण, पोलीस मानवंदना होऊन अशोकदादा साबळे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत गाऊन उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. सूत्रसंचालन शिक्षक श्री.बारटक्के यांनी केले तर माजी सैनिक संघटना अध्यक्ष विष्णू सावंत यांनी आभार मानले.

# व्हॅली क्रॉसिंगच्या व्यवसायात बेरोजगारांना संधी मिळणार?

**माथेरान : प्रतिनिधी**

व्हॅली क्रॉसिंग सारख्या साहसी खेळांमुळे मागील काही वर्षांपूर्वी माथेरानमध्ये पर्यटकांची संख्या वाढली होती. या व्यवसायात चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळत असल्याने बहुतांश पॉईंट्सवर या व्हॅली क्रॉसिंगचे जाळे पसरल्यामुळे पॉईंट्सचा देखावा न्याहाळताना जो आनंद हवा होता तो मिळत नव्हता. व्हॅली क्रॉसिंगचा आनंद घेताना आजूबाजूला कचराकुंड्या नसल्याने पर्यटकांकडून सुका कचरा जंगलात फेकल्यामुळे विखुरलेल्या अवस्थेत दिसत होता. जंगलाचा ऱ्हास होऊ नये यासाठी वनखात्याने चार वर्षांपूर्वी सर्वच पॉईंट्सवरील व्हॅली क्रॉसिंगचे जाळे काढून टाकले होते. परंतु याच साहसी खेळामुळे याठिकाणी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ देखील झाली होती. ती संख्या मागील काळात काहीअंशी रोडावली होती. वनखात्याच्या जाचक अटी शिथिल झाल्यानंतरच याठिकाणी व्हॅली क्रॉसिंग या साहसी खेळाला मान्यता मिळू शकते.

माथेरानला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने २००३ मध्ये केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाने माथेरान परिसर पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील जाहीर केला. पर्यावरण मंत्रालय साहसी खेळांना प्रोत्साहन देतानाच रोजगार निर्मितीला चालना देण्याचा सरकारचा विचार आहे. त्यामुळे आगामी काळात याठिकाणी बेरोजगार तरुणांना



व्हॅली क्रॉसिंगच्या व्यवसायात संधी मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यावेळेस विविध पॉईंट्सवर व्हॅली क्रॉसिंगच्या व्यवसायात ज्यांची आर्थिक परिस्थिती सक्षम होती. अन्य व्यवसायाचे स्रोत सुध्दा असताना त्यांना सामावून घेतले होते. त्यामुळे इथला बेरोजगार युवक मोलमजुरी करून कुटुंबाला देत होता. या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर उत्पन्न प्राप्त होते याचा अनुभव समस्त माथेरानमधील युवकांना आल्यामुळे व्हॅली क्रॉसिंग सुरू झाल्यास यामध्ये फक्त बेरोजगार युवक ज्यांच्याकडे अन्य कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही अशांना सामावून घेण्याची गरज आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर बेरोजगार युवकांच्या रोजगारावर कुठल्याही प्रकारची गदा येऊ नये यासाठी राजकीय व्यक्तींनी हस्तक्षेप करू नये अन्यथा स्वबळावर योग्य त्याठिकाणी आम्ही स्वतःचे रोप लावून व्हॅली क्रॉसिंगचा व्यवसाय सुरु करू.

# माणगावमध्ये एमएचटी-सीईटी, नीट परीक्षेसाठी होणार क्रॅश कोर्सची सोय

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील नामांकित शिक्षण संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाच्या, अशोकदादा साबळे विद्यालय व माणगांव ज्युनियर कॉलेज माणगांवच्यावतीने १२ वी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी क्रॅश कोर्सचे वर्ग सुरू केले जाणार आहेत. त्यासाठी दिशा अकॅडमी, वाईचे संस्थापक-अध्यक्ष प्रा. डॉ.नितीन कदम यांचे विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन होणार आहे. १२ वी नंतर उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना MHT-CET व NEET परीक्षेला सामोरे जावे लागते याची चांगली तयारी झाली आणि चांगले गुण मिळाले तरच पुढे डिग्री कॉलेजमध्ये प्रवेश मिळू शकतो. यासाठी पालक मुलांना पुणे, मुंबई व लातूर अशा ठिकाणी क्रॅश कोर्ससाठी ठेवत असतात परंतु अनेक पालकांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे अशा ठिकाणी ठेवता येत नाही. ही बाब संस्थेचे अध्यक्ष राजीव साबळे यांनी अनेक वेळा बोलून दाखवत होते आणि माणगांवमध्येच ही सुविधा उपलब्ध करून देता येईल का? यासाठी ते प्रयत्नशील होते. साबळे यांच्या सूचनेनुसार स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, सदस्य यांनी याबाबत सकारात्मक चर्चाही केली.

# एमपीएससी अभियांत्रिकी कॉलेज सुरू करण्याचा माजी विद्यार्थ्यांचा मानस

## ■ तब्बल चाळीस वर्षांनी अनेक देशांतून पेणमध्ये एकत्र येत आखली योजना

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील कोकण एज्युकेशन सोसायटीची इंजीनियरिंग कॉलेजची इमारत अनेक वर्षापासून बंद आहे. यामध्ये १९८३ ते २००८ पर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन जगभरात जाऊन उच्चपदावर नोकरी केली आहे. याच आठवणींना उजाळा देत कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल चाळीस वर्षांनंतर एकत्र येत पुन्हा एकदा नवीन कॉलेज सुरू करण्यासाठी आणि पुढील पिढीला आपण घेतलेल्या शिक्षणाचा फायदा समजाविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यावेळी या पुन:र्मिलनासाठी जगातल्या अनेक देशांतून या कॉलेजचे विद्यार्थी एकत्र आले होते. अमेरिका, इंग्लंड, दुबई, कॅनडा, सिंगापूर,ऑस्ट्रेलिया यासह अनेक देशांचा समावेश होता.




या वेळी जवळपास ७०० च्यावर माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यामध्ये कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांचाही समावेश होता. यावेळी त्यांनी नवीन कॉलेज उभारल्यास पुढील कॉलेजमध्ये एमपीएससी-युपीएससीचे अभियांत्रिकी वर्ग सुरू करण्याचा मानसही बोलून दाखविला,तर ज्या कॉलेजने आम्हाला ज्ञान आणि श्वास दिले त्या शहरात हजारो झाडांची लागवड आणि पुढील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आधारित मार्गदर्शनपर शिबिरे आयोजित करणार असल्याचेही सांगितले.

या संविध कार्यक्रमात संविध विशेष अंकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यामुळे या आगळ्या वेगळ्या संकल्पित सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी आई डे केअर मतिमंद मुलांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या डॉ. स्नेहलता देशमुख, भुतपूर्व कुलगुरू मुंबई विद्यापीठ, प्राचार्य शरद गणपुळेसर, प्रा.श्री.आर.बी.महाजन, कॉलेजच्या पहिल्या (१९८३) बॅचचे विद्यार्थी आणि म्हाडा मधील वरिष्ठ पदावर कार्यरत असलेले राजीव शेठ, पेणचे उदय साठे, राजू पिचिका, प्रकाश झावरे, मिलिंद बावधनकर, किरण पुजारी, कीर्ती पाटील, डॉ.श्री.अजित मराठे, माधव प्रभू, निशांत कोळगावकर, जितेंद्र गुप्ता, तुषार देसाई, मनोज भोळे, श्रीपाद फाटक, राहूल फणसाळकर, अजित दामले, आनंद देशपांडे, प्रशांत घाणेकर, रविंद्र सिंग, संदीप म्हात्रे, राजेश गुप्ते, एम्.बी.पाटील आदींच्या आयोजन कमिटीने हा कार्यक्रम यशस्वी करण्यास मोलाचे सहकार्य केले.

# माणगाव वडघरमध्ये उष:काल फाउंडेशनचा सन्मान सोहळा

## गुणवंत व्यक्तींचा केला गौरव



**माणगाव : प्रतिनिधी**

उषःकाल फाउंडेशनतर्फे आरोग्य शिक्षण आणि सार्वजनिक सेवा या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या गुणवंत व्यक्तींचा द्वितीय सन्मान सोहळा साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक वडघर इथे झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन होत्या. कार्यक्रमाला लिंगभाव क्षेत्रात उल्लेखनीय राज्यभर कार्य करणाऱ्या आरती नाईक, अविष्कार नर्सरी चे प्रमुख पर्यावरणवादी कार्यकर्ते संदेश कुलकर्णी, ज्येष्ट पत्रकार सोनाली शिंदे आणि उषःकाल फाउंडेशनचे संस्थापक नामदेव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक सेवा यात तळागाळात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींचा गौरव करण्यात आला. यावेळी उषा शिंदे आणि आदिप शिंदे यांच्या कार्याची स्मृती अनेक लोकांनी जागविल्या.

उल्का महाजन यांनी अध्यक्षीय भाषणात वैयक्तिक प्रेरणांमधून सुरु झालेल्या कार्याचे मूल्य मात्र अभिजात असल्याचा उल्लेख केला. या कार्याला त्यांनी पूर्ण परिसरात अनोखे असल्याचा आवर्जून उल्लेख केला. उषःकाल फॉउंडेशनचे संस्थापक नामदेव शिंदे यांनी फाऊंडेशनचे कार्य हेच आपल्या उरलेल्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे याचा उल्लेख केला. हा कार्यक्रम संपल्यावर अनेकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या. या कार्यक्रमासाठी परिसरातील अनेक मान्यवर, वारक ग्रामस्थ, साईनगर पुर्व रहिवासी संघ आवर्जून उपस्थित होते.

# आम्हीसुद्धा होणार पोलीस!

## रेझिंग डेच्या निमित्ताने नेरळच्या विद्यार्थ्यांनी केला निश्चय

**कर्जत : प्रतिनिधी**

२ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पोलिस स्थापन दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने २ ते ८ जानेवारी दरम्यान रेझिंग डे हा सप्ताह अनेक शाळा-कॉलेजामध्ये पोलिसांच्यावतीने आयोजित केला जातो. या सप्ताहात विद्यार्थ्यांना कायदेविषयक आणि स्वरक्षण विषयक माहिती देऊन जनजागृती करण्याचा मानस असतो. याच अंतर्गत नेरळ पोलीस ठाण्यात नेरळ येथील विद्यार्थ्यांना पोलिसांचे कामकाज, बंदूक आदींची ओळख करून देण्यात आली. तेव्हा आम्ही देखील देशसेवा करणार आम्हीही पोलिसच होणार असा निश्चय विद्यार्थ्यांनी केला आहे.

जिल्ह्यात रायगड पोलिसांच्या वतीने रेझिंग डे सुरु आहे. या अंतर्गत नेरळ येथील हाजी लियाकत हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी नेरळ पोलीस




ठाणे येथे भेट दिली. त्यावेळी विद्यार्थ्यांचे शिक्षक संतोष शिंदे, रेखा यादव, अम्यांडा कोयलो आदी शिक्षक उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत काळे, महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी मुळीक, देवेंद्र शिनगारे आदींनी पोलिसांचे कामकाज कसे चालते. बंदुकीची माहिती करून करून दिली. बंदूक हाताळताना तिची नळी कायम खाली असणे का गरजेचे आहे. यासह मुलींनी स्वरक्षणाचे धडे घेणे किती गरजेचे आहे. याची माहिती करून दिली. तसेच पोलीस होण्यासाठी तयारी कशी करावी, ट्रेनिंगमध्ये काय काय करावे लागते असे प्रश्न मुलांनी देखील उत्सुकतेपोटी विचारून अधिकची माहिती घेतली. यामुळे मुलांमध्ये पोलिसांच्या कामाविषयी अभिमान निर्माण झाला तर आम्ही सुद्धा पोलीस दलात सहभागी होऊ असा निश्चय मुलांनी व्यक्त केला.

# लोकशाहीसाठी पत्रकारितेचे महत्त्वाचे योगदान -तांबोळी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुका ग्रामीण मराठी पत्रकार संघ व खालापूर तालुका वकील बार असोशिऐशन यांच्या विद्यमाने आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित पत्रकारांचा सन्मान,या कार्यक्रमात बोलताना पत्रकारितेचे काम केवळ बातम्या देण्याचं नसून गरिबांना न्याय, विकास कामे, इत्यादी शास्वत विकास कामातही मोलाचे असते.पत्रकारिता ही चौथा आधारस्तंभ असते असे प्रतिपादन खालापूर तालुका तहसीलदार आयुब तांबोळी यांनी या वेळी काढले.

अलीकडेच इलेक्ट्रॉनिक्स मीडिया ही खूप मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे बदलत्या तंत्रज्ञानाची माहिती घेऊन पत्रकारांनी त्याप्रमाणे आपले कार्य आचरणात आणले पाहिजे. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून आम्ही या पत्रकारांच्या हितासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याचा विचार करीत आहोत.

या कार्यक्रमात गटविकास अधिकारी बालाजी पुरी पंचायत समिती खालापूर पी. जी. खडके, दुय्यम निबंधक खालापूर ॲड. सिद्धेश जितेकर.अध्यक्ष, खालापूर तालुका वकीलबार असोसिएशन ॲड. जयवंत पाटील अध्यक्ष खालापूर तालुका युवा वकील संघटना, सुधीर माने अध्यक्ष खालापूर तालुका ग्रामीण मराठी पत्रकार संघ रविंद्र जाधव रायगड भूषण कार्याध्यक्ष, खालापूर तालुका ग्रामीण पत्रकार संघ ॲड. राजदत्त धारकर (नोटरी) वालचंद्र ओसवाल माजी सरपंच वावोशी हजर होते.



# आता श्रीलंकेविरुद्ध वनडे मालिका

**गुवाहटी : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्ध टी-२० मालिका जिंकल्यानंतर टीम इंडिया आता वनडे मालिकेसाठी सज्ज झाली आहे. यातील पहिला सामना मंगळवारी (दि. १०) गुवाहटी येथे खेळला जाणार आहे.

भारताने श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टी-२० सामन्यात विजय मिळवून मालिका २-१ने जिंकली. श्रीलंकेविरुद्धच्या घरच्या मालिकेपूर्वी रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघ ऑस्ट्रेलियात इंग्लंडकडून उपांत्य फेरीत पराभूत झाला. त्यामुळे टी-२० आंतरराष्ट्रीय विश्वचषक जिंकण्यात अपयशी ठरला. त्यानंतर भारतीय निवडकर्त्यांनी संघात मोठे बदल केले आहेत. श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत विशेषकरून सूर्यकुमार यादवने छाप उमटविली. आता उभय संघांमध्ये तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका रंगणार आहे.

टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली बांगलादेशविरुद्धच्या एकदिवसीय आणि कसोटी मालिकेनंतर विराट कोहली विश्रांती घेत आहे. श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून तो परतणार आहे. केवळ विराटच नाही, तर कर्णधार रोहित शर्मा आणि केएल राहुल, मोहम्मद शमी आणि जसप्रीत बुमराहसारखे दिग्गजदेखील या मालिकेतून पुनरागमन करीत आहेत.

## पहिल्या सामन्यासाठी टीम इंडिया सज्ज



**भारताचा वन डे संघ :** रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, लोकेश राहुल (यष्टीरक्षक), ईशान किशन (विकेटकीपर), हार्दिक पंड्या (उपकर्णधार), वॉशिंग्टन सुंदर, युझवेंद्र चहल, कुलदीप यादव, अक्षर पटेल, मोहम्मद शमी, उम्रान मलिक, अर्शदीप सिंग.

### बुमराह खेळणार नाही

मागील अनेक महिने दुखापतीमुळे संघाबाहेर असलेल्या जसप्रीत बुमराहची श्रीलंकेविरुद्धच्या वन डे मालिकेत अनपेक्षित निवड केली गेली. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीने बुमराह तंदुरुस्त असल्याचे रिपोर्टकार्ड दिला अन् बीसीसीआयने लगोलग त्याची वन डे मालिकेसाठी संघात निवड केली, पण तो वन डे मालिकेत खेळणार नसल्याचे समजते आहे. ट्वेन्टी-२० वर्ल्डकप स्पर्धेपूर्वी बीसीसीआयने दुखापतग्रस्त बुमराहला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत खेळवले आणि त्याचा परिणाम त्याची दुखापत बळावली व त्याला वर्ल्डकपला मुकावे लागले. आताही जसप्रीतला वनडे संघात सहभागी करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला, पण वेळीच बीसीसीआयने बुमराहला वन डे मालिकेत न खेळवण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त 'क्रिकबझ'ने दिले आहे. प्रमुख गोलंदाजाच्या बाबतीत बीसीसीआयला आता घाई करायची नाही.





# माथेरानमध्ये अश्वशर्यतीचा थरार

## मुर्तुझा मोरबीवाला ठरला सर्वोत्कृष्ट घोडेस्वार

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमधील ज्येष्ठ अश्वपालक कै. खलील महाबळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे पुत्र हैदर महाबळे यांनी फ्रेंड्स फॉर एव्हर ग्रुपच्या माध्यमातून वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल येथे अश्वशर्यतीचे आयोजन केले होते. त्यास स्थानिक तसेच मुंबईमधील अनेक घोडेस्वारांसह प्रेक्षकांनी व पर्यटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या अश्वशर्यतीत मुंबईतील घोडेस्वार मुर्तुझा मोरबीवाला याने विजेतेपद पटकाविले. उपविजेता यश शिंदे आणि ओंकार आखाडे यांनीही उत्तम कामगिरी बजावली. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत पंच म्हणून संदीप शिंदे, लक्ष्मण कदम, वसीम महाबळे, प्रशाम दिवाडकर,दिनेश आखाडे, किरण जाधव यांनी जबाबदारी बजावली. स्पर्धेसाठी हैदर महाबळे, करन संघवी, नरेन महामुनकर यांनी विशेष मेहनत घेतली.





**पनवेल : वहाळ येथे उलवे नोड प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा रंगली. या स्पर्धेच्या रविवारी शेवटच्या दिवशी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तेथे भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहित केले तसेच उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, न्हावा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, भाजप नेते किशोर पाटील, सचिन घरत, अपूर्व ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि खेळाडू उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)

# छत्रपती संभाजी महाराज कुस्ती संकुलातील आठ जणांची 'महाराष्ट्र केसरी'साठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे क्रीडाप्रेमी आमदार प्रशांत ठाकूर संस्थापक अध्यक्ष असलेल्या नितळस येथील छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय कुस्ती संकुलातील आठ कुस्तीपटूंची पुणे येथे १० जानेवारीपासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी नयन रवींद्र पाटील (४८ किलो वजनी गट), सुशांत नामदेव पाटील (६० किलो), आदित्य भास्कर मढवी (६५ किलो), साजन चाहू पावशे (६१ किलो), महेंद्र काशिनाथ म्हात्रे (६१ किलो), विकास जयराम पावशे (९२ किलो), विकास जगन्नाथ वालिलकर (७९ किलो) आणि पवन ईश्वर पावशे (४५ किलो) याची, तर पवन ईश्वर पावशे याची सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी ४५ किलो वजनी गटातून निवड झाली आहे.

निवड झालेले सर्व खेळाडू छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय कुस्ती संकुलात राष्ट्रीय पैलवान वस्ताद रूपेश पावशे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. यासाठी मारुती पावशे, शरद पावशे, बाळाराम काटे, संतोष गोंधळी, नामदेव पाटील, वावंजे गावचे सरपंच डी. बी. म्हात्रे व ग्रामस्थ मंडळ यांचे सहकार्य लाभत आहे.

दरम्यान, कुस्तीपटूंची मानाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवड झाल्याने त्यांचे छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय कुस्ती संकुलाचे संस्थापक अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# कबड्डी स्पर्धेत पाले खुर्द संघ विजेता

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील नगरपंचायत हद्दीतील महाराणा प्रताप नगरच्या वतीने आयोजित माजी आमदार तथा लोकनेते स्व. अशोकदादा साबळे स्मृतीचषक कबड्डी स्पर्धेत पाले खुर्द कबड्डी संघाने पन्हळघर संघाचा पराभव करीत विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत माणगाव तालुक्यातील ३२ संघांनी सहभाग घेतला होता.

तृतीय क्रमांक उंबर्डी संघाने, तर चतुर्थ क्रमांक यजमान महाराणा प्रताप नगर संघाने मिळविले. विजेत्या चारही संघांना बक्षीस देण्यात आले. वैयक्तिक बक्षिसांमध्ये उत्कृष्ट चढाईपटू म्हणून नितेश (उंबर्डी), उत्कृष्ट बचावपटू व पब्लिक हिरो (अष्टपैलू खेळाडू) अमन शिंदे (पन्हळघर) यांना गौरविण्यात आले. पंच निलेश साळवी व केतन भिंगारे यांनी भूमिका बजावली.



(छाया : सलीम शेख)

स्पर्धेचे उदघाटन व बक्षीस जि.प.चे माजी सभापती ॲड. राजीव साबळे, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे शहरप्रमुख सुनील पवार, नगरसेवक कपिल गायकवाड, दिनेश रातवडकर, हेमंत शेट, माजी ग्रामपंचायत सदस्य अरुण पवार, उद्योजक विरेश येरुणकर, माजी नगरसेवक नितीन बामगुडे, मारवत पवार आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये गुरुवारी यंग इंडिया रन २०२३

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वामी विवेकानंद यांची जयंती व राष्ट्रीय युवा दिनानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या गुरुवारी (दि. १२) पनवेलमध्ये यंग इंडिया रन २०२३चे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील वडाळे तलावाजवळ सकाळी ६ वाजता या पाच किमी अंतराच्या दौडला सुरुवात होणार असून दौड पूर्ण करणाऱ्या पहिल्या ५०० जणांना आकर्षक टी-शर्ट आणि आकर्षण मेडलने सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये सहभाग घेण्यासाठी रोहित जगताप (८६९१९३०७०९), अक्षय सिंह (९८२०८३८८५१), देवांशू प्रभाळे (८४३३५१३५४०) किंवा अजिंक्य भिडे (८८५०६४४२०७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे.

# रिटघर विद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय येथे वार्षिक क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आला. त्यास प्रतिसाद लाभला.

या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य सुभाष भोपी, बाळाराम भोपी, बळीराम भोपी, राजेश भोपी, वंदना भोपी, प्रल्हाद भोपी, वासुदेव भोपी, दीपक पाटील, भालचंद्र भोपी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व उत्साहाचे प्रतिक हायड्रोजन फुगे हवेमध्ये सोडून करण्यात आले.

महोत्सवात विद्यालयातील पाचवी ते दहावी आंतरवर्गीय खो-खो, कबड्डी, धावणे, गोळाफेक, भालाफेक, लंगडी आदी खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकांनी योगदान दिले. शिक्षक श्री. शेळके यांनी सामन्यांचे समालोचन केले, तर ए. ए. पाटील व व्ही. आर. जोशी यांनी पंचाचे काम पाहिले. या वेळी पंचक्रोशीतील शिक्षण व क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते. क्रीडा महोत्सव अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात झाला.



**नावडे (ता पनवेल) : जय हनुमान क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित आमदार चषक टेनिस क्रिकेट स्पर्धेस भारतीय संघातील आंतरराष्ट्रीय माजी क्रिकेटपटू व आयपीएल प्रशिक्षक संजय बांगर यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांचे स्पर्धा आयोजक क्रिकेटपटू प्रशांत खानावकर व सहकाऱ्यांनी स्वागत केले.**

# बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन, शिवशक्ती संघांना विजेतेपद

## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

येथील बंड्या मारुती सेवा मंडळातर्फे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत नांदेडच्या बाबुराव चांदेरे फाउंडेशन पुरुष गटात, तर मुंबई शहरच्या शिवशक्ती संघाने महिला गटात विजेतेपद पटकाविले. स्वस्तिकचा आकाश रूडले पुरुषांत स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला, तर शिवशक्तीची अपेक्षा टाकळे महिलांत स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली.

ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशनने उपनगरच्या स्वस्तिक मंडळाचा प्रतिकार ३५-१९ असा सहज मोडून काढत जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन संघाने आक्रमक सुरुवात करीत पहिल्या काही मिनिटांतच स्वस्तिकवर लोण देत १०-०१ अशी आघाडी घेतली, पण स्वस्तिकनेदेखील त्यानंतर जशास तसे उत्तर देत हा लोण फेडत ही आघाडी ११-१२ अशी कमी केली. मध्यंतराला १५-१३ अशी फाउंडेशनकडे आघाडी होती. दुसऱ्या डावात बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशनने आपला खेळ अधिक गतिमान करीत आणखी दोन लोण स्वस्तिकवर चढविले. दुसऱ्या डावात बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशनने २३ गुणांची कमाई केली, तर स्वस्तिकला अवघे सहा गुण मिळविता आले.

महिलांच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या शिवशक्ती महिला संघाने उपनगरच्या महात्मा गांधी स्पोर्ट्सचा ३९-१८ असा सहज पराभव करत जेतेपदावर आपले नाव कोरले. धारदार चढाया व भक्कम पकडी करीत शिवशक्तीने पूर्वार्धातच प्रतिस्पर्ध्यांवर तीन लोण चढवित ३१-०९ अशी भक्कम आघाडी घेतली. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा भरणा असणाऱ्या शिवशक्तीने सामना लीलया आपल्या बाजूने झुकविला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com